म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.

विषय व्या. वा

दा. क्र. 2452

BVBK-0402542

सानेगुरुजींच्या गोड गोष्टी सानेगुरुजींच्या गोड गोष्टी सानेगुरुजींच्या गोड गोष्टी

"करी मनोरंजन जो मुलांचे।
जडेल नाते प्रभुशी तयाचे।।"

गोड गोष्टी : भाग सहावा

# सोराब नि रुस्तुम


: लेखक :

सानेगुरुजी, एम्. ए.


सानेगुरुजींच्या गोड गोष्टी सानेगुरुजींच्या गोड गोष्टी सानेगुरुजींच्या गोड गोष्टी

BVBK-0402542

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगाव, मुंबई

किंमत आठ रुपये

© केशव भिकाजी ढवळे

नवीन आवृत्ती : ३१ मार्च १९९०

सानेगुरुजींच्या गोड गोष्टी भाग १ ते १०
किंमत प्रत्येकी आठ रुपये

टाइपसेटिंग :
अक्षय फोटोटाइपसेटर्स, 'कुलदीपक', सुभाष पथ,
महानगरपालिकेशेजारी, ठाणे-४००६०१

प्रकाशक :
धनंजय बाळकृष्ण ढवळे, केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ सदन, पहिली भटवाडी, गिरगाव, मुंबई-४

मुद्रक :
प्रकाश ढवळे, प्रकाश प्रतिरूप,
श्रीसमर्थ सदन, गिरगाव, मुंबई-४.

# माणुसकीचा धर्म

गोड गोष्टींचा हा सहावा भाग. यात ४ गोष्टी आहेत. पहिली गोष्ट जवळजवळ एक सत्यकथा आहे. नावेगावे थोडी काल्पनिक. दुसरी गोष्ट जपानी दंतकथेतील आहे. माझ्या भाषेत माझ्या पद्धतीने ती मांडली आहे. भाषांतर नाही. कथासूत्र मात्र मूळचे. तिसरी गोष्ट माझ्या एका थोर देशसेवकाच्या गड्याने मला सांगितली. त्या गड्याचे नाव साधू. साधूला पुष्कळ गोष्टी येत. मी त्या ऐकत असे. त्याने सांगितलेली ही गोष्ट मला फार आवडली. मी ती रंगवून खुलवून लिहून काढली. चौथी गोष्ट फिर्दोसी या प्रसिद्ध फारशी महाकवीच्या शहानामा यातील. इंग्रजीत आर्नोल्डने या गोष्टीवर महाकाव्य लिहिले आहे. ते माझ्या डोळ्यासमोर होते.

साने गुरुजी

भाग सहावा : सोराब नि रुस्तुम

# अनुक्रमणिका


वामन भटजींची गाय — — — ५

पाखराची गोष्ट — — — — — — १५

उदारांचा राणा — — — — — — ३०

सोराब नि रुस्तुम — — — — — ४८

सोराब नि रुस्तुम : कथा पहिली

# वामन भटजींची गाय

कोण राहाते त्या घरात? त्या जुन्या पडक्या घरात? त्या भयाण घरात? पहाटेच्या वेळेस पाखरांची किलबिल सुरू होते व त्या घरातून मंगल वेदमंत्र कानांवर येतात. कोण म्हणते ते मंत्र? तेथे भूत तर नाही ना राहात? कोणी ब्रह्मसमंध तर नाही ना? कोण आहे त्या घरात?

त्या घरात वेदमूर्ती वामनभटजी राहातात. विद्वान आहेत हो. दशग्रंथी आहेत. वेद म्हणजे त्यांच्या हातचा मळ. सारा ऋग्वेद त्यांच्या ओठांवर जसा खेळतो आहे. वेद म्हणजे त्यांची करमणूक, त्यांचा आनंद. शहरातील लोकांच्या तोंडी बोलपटांतील गोड गाणी असतात. वामनभटजींच्या तोंडी वेदमंत्र असत.

वामनभटजींचे वडील बंधू मोठे शास्त्री होते. भावाजवळच वामनभटजी बरेचसे शिकले. मधुकरी मागून शिकले. वडील भाऊ जरा तामसी व संकुचित वृत्तीचे होते. वामनभटजींस त्याचे वाईट वाटे. वामनभटजींस लहानपणापासून प्रेमाचा ओलावा मिळाला नाही. मोठ्या कष्टाने वेदविद्या त्यांनी संपादन केली.

त्यांनी आता स्वतंत्र व्हायचे ठरविले. त्यांचे लग्न झाले होते की नाही, माहीत नाही. कोणी म्हणतात, झाले होते; परंतु वामनभटजींची पत्नी कोणी कधी पाहिली नाही. आज तीस वर्षे त्या गावात ते आहेत; परंतु ते एकटेच आहेत.

तो पालगड गाव ब्राह्मणवस्तीचा होता. शेसवाशे ब्राह्मणांची घरे. तेथे वामनभटजींचे बरे चाले; परंतु त्यांचा वेळ कसा जावयाचा? वेद शिकविण्याची त्यांनी शाळा काढली. काही मुले त्यांच्याकडे सकाळी शिकायला येत. दुपारी

शिकायला येत; परंतु ही मुले त्यांना भीत. ते त्या मुलांवर एकदम घसरा घालायचे. कधी कधी त्यांना बेदम मारायचेही! ते शिकवीत छान; परंतु जर का तब्बेत गेली, तर मात्र जमदग्नीचा अवतार; परंतु एखादे वेळेस त्या मुलांनाही प्रेमाने जवळ घ्यायचे, त्यांना खाऊ द्यायचे. त्यांच्या घरची प्रेमाने चौकशी करायचे. काही भाजी घरी असली, त्यांना कोणी दिली असली व जास्त असली तर मुलांना म्हणायचे, 'जा रे घरी घेऊन, आईला द्या.'

त्यांच्या अंगात कधी नसायचे. नेसूचा एक पंचा व खांद्यावर एक लहानसा फडका. मात्र तपकिरीची डबी कनवटीस नेहमी असायची आणि त्यांना कोणी भेटला तर तपकिरीसाठी त्यांचा हात सहज पुढे व्हावयाचा.

ते एकटे होते; परंतु एकट्याला काय नको? दिवसेदिवस वेदविद्येला मानही कमी होत चाललेला. उद्या म्हातारपणी काही आधार नको का? थोडी पुंजी नको का? मग काय करावे? वामनभटजींनी भाड्यासाठी एक बैलगाडी करण्याचे ठरविले. सुंदर गाडी त्यांनी विकत घेतली. सुंदर, रुंद खांद्यांचे, आखूड शिंगी, एकरंगी बैल त्यांनी विकत घेतले. गाडी तयार झाली. वामनभटजी गाडीवान झाले.

बैलांची ते किती काळजी घ्यायचे! बैलांच्या अंगावर सुंदर झुली होत्या. वामनभटजींचा नेसूचा पंचा फाटका असेल, खांद्यावरचा फडका जीर्ण झाला असेल, परंतु त्या झुली नीट असत आणि बैलांच्या कपाळावर गोंडे बांधलेले. त्या शुभ्रवर्ण बैलांच्या कपाळावर निळ्या रंगाचे ते गोंडे किती खुलून दिसत आणि गळ्यात घणघण वाजणाऱ्या घंटा, शिवाय पितळी साखळ्या. ते बैल पाहाताच पाहाणाऱ्याच्या डोळ्यांचे पारणे फिटे. असे बैल आपण कोठें पाहिले नाहीत असे सारे म्हणत.

वामनभटजी बैलांना कधी चाबूक मारायचे नाहीत की शिमटी लावायचे नाहीत. एकदा त्यांची व दुसऱ्या एका गाडीवानाची पैज लागली होती. बैलाला काठी न लावता, चाबूक न मारता आधी कोण जाऊन पोचतो! आणि वामनभटजी एक तास आधी जाऊन पोचले होते. त्यांनी नुसते शब्दाने खुणावले, आवाज करून इशारत दिली, तरी बैलांना कळे.

मधूनमधून आपल्या बैलांना ते कढत पाण्याने आंघोळी घालायचे. कोठे खरचटलेले असले तर त्यावर तेल लावायचे. किती प्रेमाने ते बैलांना स्नान

घालीत! त्या वेळेस अर्जुनाच्या घोड्यांचा खरारा करणारा श्रीकृष्णच आपण पाहात आहोत की काय असे वाटे आणि बैलांच्या अंगावर तांब्याने पाणी घालताना मुखाने मंगल वेदघोष सुरू असावयाचा. मोठे प्रसन्न, पावन असे ते दृश्य असे.

एखादे वेळेस वामनभटजींची गाडी येत असावी. पहाट झालेली असावी. थंडगार वारा सुरू असावा. बैलांच्या गळ्यातील मंजुळ अशा घंटा वाजत असाव्यात. आकाशात चार ठळक तारे अद्याप चमकत असावेत. पाखरांची रस्त्याच्या कडेला असणाऱ्या झाडांवरून थोडी गोड किलबिल सुरू झालेली असावी आणि गाडीवर बसलेले, हातात कासरा असलेले वामनभटजी वेदमंत्र म्हणण्यात रंगून गेलेले असावेत! ते बैलही जणू आनंदत. त्यांच्या अंगावरही जणू रोमांच उभे राहात. अर्जुनाच्या घोड्यांनी भगवंतांनी सांगितलेली गीता ऐकली. वामनभटजींचे बैल वेद ऐकत.

या वेदमूर्ती भटजींस भय माहीत नसे. कोठे साप आला, कोणाच्या घरात घुसला तर काठी घेऊन ते धावत जायचे. एकदा गाडी हाकीत असता रात्री रस्त्यात बैल एकाएकी गजबजू लागले. वाघ आहे की काय जवळपास? अरे होय रे होय! तो पाहा वाघ. ते पाहा जळजळीत डोळे! जाळीजवळ तो उभा आहे. घेणार का उडी? वामनभटजींनी खाली उडी घेतली. ते जोखडाजवळ वेदमंत्र म्हणत उभे राहिले. तो निर्भय पुरुषव्याघ्र पाहून वनव्याघ्र प्रणाम करून निघून गेला.

परंतु वामनभटजींचा हा आनंद दैवाला बघवला नाही. ते बैल म्हणजे जणू त्यांचे कुटुंब. बैलांना खायला घालायचे, पाणी पाजायचे. बैलांना आंघोळ घालायची, झुली घालायच्या. बैलांचे गोंडे नवे आणायचे, घंटांची दोरी नवीन रंगीत करायची, असा बैलांचा संसार चालू असे; परंतु पायलागाचा रोग आला आणि हे दोन सुंदर बैल लागले. त्यांच्या पायांत क्षते पडली. काडीला तोंड लावीत ना. पाय सारखे झटकीत. वामनभटजींनी सारे उपाय केले; परंतु गुण येईना. त्या बैलांजवळ ते बसत. ते बैल कृतज्ञतेने आपल्या धन्याकडे बघत. वामनभटजी त्यांच्या अंगावरून हात फिरवीत. प्रेमळ ममताळू हात! ज्या हातांनी कधी चाबूक मारला नाही, आर टोचली नाही, असे हात! बैलांच्या

काळ्यानिळ्या सुंदर डोळ्यांतून ते पाहा पाणी येत आहे. खांद्यावरच्या फडक्याने वामनभटजी बैलांचे ते अश्रू पुशीत आहेत. करुण असा तो प्रसंग होता.

आणि एके दिवशी त्या पडवीत ते दोन्ही बैल मरण पावले. त्या स्वच्छ सुगंधी पडवीत त्या उमद्या व दिलदार प्राण्यांनी पवित्र वेदमंत्र ऐकत राम म्हटला. वामनभटजी रडत बसले. त्या बैलांना त्यांनी गडीमाणसे बोलावून वाशाला बांधून उचलून नेले. फरफटत नेले नाही. एका शेतात खोल खोल खड्डे खणून त्यांना त्यांनी मूठमाती दिली आणि पुढे काही दिवसांनी त्या ठिकाणी त्यांनी दोन आंब्याची झाडे लावली. मधून मधून त्या जागेला ते भेट द्यायचे. क्षणभर सद्‌गदित होऊन बसायचे व निघून जायचे.

वामनभटजींच्या ओटीवर बैठकीच्या खोलीत तुम्हाला काय दिसेल ? तेथे राजाराणीच्या तसबिरी नाहीत. कसली प्रशस्तीपत्रे नाहीत. मग तेथे काय आहे ? तेथे बैलांच्या झुली आहेत. त्या घंटा आहेत. ते गोंडे आहेत. त्या आठवणी, ती स्मृतिचिन्हे वामनभटजींनी ठेवली आहेत.

त्या गावात दुसरेही असेच एक एकटे गृहस्थ होते. त्यांची थोडी शेतीवाडी असे. तेही हाताने स्वयंपाक करीत. वामनभटजींना या गृहस्थांविषयी सहानुभूती असे. ते कधी कधी त्यांच्याकडे जायचे. तेथे चहा करायचे. स्वतः थोडा घ्यायचे व त्या मित्रासही द्यायचे. कधी उन्हाळ्याच्या दिवसांत कच्ची कैरी किसायचे. तिच्यात गूळ, थोडे तिखटमीठ घालून त्या मित्रास द्यायचे व स्वतः खायचे. कधी आंब्याचे पन्हे करायचे. पावसाळ्याच्या दिवसात कोवळ्या कोवळ्या गराच्या अमृतप्रमाणे लागणाऱ्या काकड्या दोघे खायचे. असा वामनभटजींचा व त्या गृहस्थांचा लोभ होता. त्या गृहस्थांचे नाव भाऊराव.

बैल मेल्यापासून वामनभटजी दुःखी होते हे भाऊरावांच्या ध्यानात आले होते. भाऊरावांना वेळ जायला कोर्टकचेरीचे वेड होते; परंतु त्यांच्या मित्राचा वेळ कसा जायचा ? भाऊरावांकडे एक गाय होती. ही गाय वामनभटजींस द्यावी असे त्यांच्या मनात आले.

एकदा दोघे बोलत बसले होते. बैलांच्या आठवणी निघाल्या होत्या.

'वामनभटजी, तुम्हाला एक गोष्ट सांगू?'

'कोणती ?'

'तुम्ही बैलांची सेवा केलीत, आता बैलांच्या आईची करा. गोमातेची सेवा करा. मी तुम्हाला एक सुंदर गाय देतो. कराल तिची सेवा? तुमचा वेळ जाईल. करमणूक होईल. गाईसारखे जनावर नाही बघा. किती निर्मळ, सौम्य, सुंदर असते गाय! नाही? देऊ का तुम्हाला?'

'द्या. खरेच, माझा वेळ जाईल.'

'परंतु दूध नाही हो ती फार देत.'

'देईल तेवढे देईल. कामधेनू जर प्रसन्न झाली तर सारे देईल.'

'परंतु ती कामधेनू हवी.'

'भाऊराव, दुर्जनच एक दिवस संत होतात. कोळशांचेच म्हणे हिरे होतात. साध्या गाईतूनच कामधेनू तयार होत असतील. द्या तुमची गाय. ती माझी कामधेनू होईल.'

आणि एके दिवशी भाऊरावांनी ती काळी गाय वामनभटजींस दिली. वामनभटजींनी तिचे सावळी असे नाव ठेवले. जेथे पूर्वी ते बैल असत तेथे आता सावळी शोभू लागली.

ते स्वतः ती पडवी झाडीत. गोठा कसा आरशासारखा ठेवीत. पावसात घरात इतरत्र गळले तरी चालेल, परंतु गाईच्या पडवीवरची कौले नीट ठेवली जात. गोमातेच्या गोठ्यात नाही गळता कामा. पावसाळा सुरू झाला असावा. हिरवे हिरवे गवत तयार झालेले असावे. वामनभटजी मोठ्या पहाटे उठत व पाऊस नसला तर सावळीस घेऊन पसाऱ्याला जात. पसारा म्हणजे पहाटे गुरांना पावसाळ्यातील हिरवे हिरवे गवत खायला घेऊन जाणे. वामनभटजी गाईचे गोवारी झाले. त्यांनी गुराख्यांकडून एक बांबूची बासरी करून घेतली. पहाटे रानात सावळी चरत असावी व भटजींची बासरी सुरू असावी. मध्येच बासरी थांबे व वेदमंत्र त्या वनात सुरू होत.

वेळच्या वेळेस ते पाणी पाजायचे. वेळच्या वेळेस चारा घालायचे. कधी दुपारी, कधी रात्री तिच्या मानेखाली हात घालून खाजवायचे. तिच्या अंगावरून हात फिरवायचे. सावळीही प्रेमाने त्यांचे अंग मग चाटायची.

उन्हाळ्याच्या दिवसांत पाणी आटायचे. लांबून पाणी आणावे लागे. ते पाणी गढूळ असे. विहिरीच्या तळाचा गाळ त्यात असे. वामनभटजी ते पाणी गाळीत, निवळू देत आणि मग सावळीला ते निर्मळ पाणी पाजीत.

सावळी या सेवेने प्रसन्न झाली. अर्धा शेर दूध देणारी सावळी पाच शेरांचा लोटाभर दूध देऊ लागली. लोकांना आश्चर्य वाटले. वामनभटजी आता दुधावरच राहू लागले. कोणाला औषधाला गाईचे दूध लागले तर तो वामनभटजींकडे येई. कोणाला गाईचे तूप लागले तर ते वामनभटजींकडे येत. तूप कसे पिवळे रसरशीत दिसे!

सावळीचे दूध-तूप ते विकीत नसत. गाय आधीच निर्मळ असते; परंतु वामनभटजीही तिला इवलीसुद्धा घाण लागू नये म्हणून जपत. तसेच थंडीच्या दिवसांत तिच्या अंगावर काही घालीत. बैलांच्या गळ्यातील त्या साखळ्या त्यांनी सावळीच्या गळ्यात घातल्या.

एकदा काय झाले, वामनभटजींवर कोठे तरी दूर जाण्याचा प्रसंग आला. कित्येक वर्षांत ते दूर कोठे गेले नव्हते; परंतु काही तरी महत्त्वाचे काम होते खरे. काय होते कुणास ठाऊक! दोन महिने तरी त्यांना तिकडे लागले असते. आता सावळीची काळजी कोण घेणार?

भाऊरावही कोठे दूर गेलेले होते. वामनभटजी जरा चिंतेत पडले. कोठे ठेवायची सावळी? त्या गावात पिलंभटजी म्हणून एक वैदिक होते. वामनभटजींच्या सावळीची ते नेहमी स्तुती करीत असत. त्यांच्याकडे गाय ठेवावी असे वामनभटजींनी ठरविले.

'पिलंभटजी, मग ठेवाल ना दोन महिने तुमच्याकडे गाय? दुभती आहे –' वामंनभटजींनी विचारले.

'किती देते दूध?'

'पाच शेर तुम्हाला होईल. तुमची मुलेबाळे आहेत. जपा मात्र.'

'बाकी तुमची सावळी म्हणजे रत्न आहे. अशी गाय मी माझ्या साऱ्या जन्मात पाहिली नाही आणि भाऊरावांकडेसुद्धा ती फार दूध देत नसे. तुम्ही काय खायला घालता?'

'लोक घालतात तोच चारा. माझ्याजवळ का काही जादूमंत्र आहे? वेळच्यावेळेस तुम्ही तिला पाणी पाजा. चारा द्या. मी येईपर्यंत माझे हे प्राण सांभाळा.'

'ठीक आहे. माझी चार गुरे आहेत त्यांत तुमची सावळी राहील.'

वामनभटजी घरी गेले. ते सावळीजवळ वेदमंत्र म्हणत उभे राहिले; परंतु पुढे त्यांच्याने म्हणवत ना ते मंत्र. डोळे अश्रुमंत्र म्हणू लागले. सावळीजवळ ते तिच्या पाठीवरून हात फिरवत उभे होते.

'सावळ्ये, दोन महिन्यांनी मी येईन हो. दु:खी नको होऊ. कष्टी नको होऊ. चारा खात जा, पाणी पीत जा. हट्ट नको करू. पिलंभटजी तुझी काळजी घेतील हो बये.' असे ते तिला म्हणाले.

मोठ्या दु:खाने त्यांनी तिचे दावे सोडून हातात धरले. गाय घेऊन निघाले. पिलंभटजींकडे गाय घेऊन आले. त्यांच्या गोठ्यात त्यांनी सावळीला बांधले. तिच्यापुढे आपल्या हातांनी त्यांनी चारा घातला. पाठीवरून हात फिरवून, मानेखालून हात घालून, तिला निरवून ते निघाले.


वामनभटजी गेले. दूर दूर गेले. सावळी हंबरत राही. जणू आपल्या प्रेमळ वत्साला, प्रेमळ भक्ताला हाका मारी. तिला तिचा प्रेमळ भक्त दिसेना. ती ना खाई नीट चारा, ना पिई नीट पाणी आणि पिलंभटजी तिच्याजवळ प्रेमाने थोडेच बोलणार! ते आपल्या गाईम्हशींना नीट चारा घालीत. जाडा भरडा सावळीला घालीत. तो दुजाभाव सावळीला असह्य होई. तो अपमान होता परंतु अपमान गिळून ती दिवस कंठीत होती.

पिलंभटजी पाच शेरांचा लोटा हातात घेऊन दूध काढायला बसत; परंतु सावळीला पान्हाच फुटेना. कास भरून येईना. पिलंभटजी संतापत व 'वामनभटजी म्हणजे गप्पाड्या' असे म्हणत. आपल्या भक्ताची टिंगल सावळीला खपत नसे. ती मग थोडेसे तरी दूध देई.

'अहो, तिला दोन सोटे मारीत जा व दूध काढायला बसत जा.' धोंडभटजी म्हणाले.

'माझ्याही मनात तेच आहे. ढोराला शेवटी चाबूकच हवा,' पिलंभटजी म्हणाले.

आणि आता दुधाच्या लोट्याबरोबर ते सोटाही घेऊन जात. आधी दोन सोटे मारून मग ते कासेला हात लावीत; परंतु ती तेजस्वी गाय मग एकदम लाथा मारी. पिलंभटजी रागावे व भराभरा वाटेल तितके मारी. कळवळे ती गाय!



हळुहळू सावळी अजिबात आटली. एक थेंबसुद्धा दुधाचा निघेना. तिला आता खाणेपिणेही पोटभर मिळेना. तिचे डोळे खोल गेले. हाडे दिसू लागली. सावळी दोन महिने केव्हा होतात याची वाट पाहात होती.

तिकडे वामनभटजींस रोज सावळीची आठवण यायची. पानात एक लहानसा घास सावळीसाठी काढून ठेवायचे. सावळीसाठी रामरक्षा म्हणायचे. सावळी सुखरूप असो म्हणून देवाची प्रार्थना करायचे.

वामनभटजींचे काम संपले आणि ते आपल्या गावी परत यायला निघाले. एके गावी मोटारीने येऊन तेथून ते पालगडला पायी येत होते. वेद म्हणत येत होते. सावळीची आठवण काढीत येत होते. आला गाव. गावाच्या हद्दीत ते शिरले. तो लोक रस्त्यातून भेटू लागले.

'सावळी कशी आहे हो माझी ?' ते विचारीत.

'मेली नाही अजून. तुमच्यासाठी जीव धरून आहे.' श्रीधरपंत म्हणाले.

'म्हणजे ?' त्यांनी धक्का बसून विचारले.

'अहो, एक थेंबभर दूध देत नाही. पिलंभटजी काय फुकट खायला घालील ? हात लावावा कासेस तर फाडफाड लाथा मारते. तुम्ही उगीच फुशारकी मिरवीत असा. पाच शेर दूध देते नि अशी आहे नि तशी. माझी कामधेनू आहे. साऱ्या गप्पा. तरी आम्हाला वाटतच होते.'

'अहो, खरंच ती कामधेनू आहे. तुम्ही पाहाल. ती लोटाभर दूध देईल.' वामनभटजी म्हणाले.

वामनभटजींभोवती लोक गोळा झाले. घरी सामान ठेवून हातपाय धुवून वामनभटजी पिलंभटजींकडे आले. एकदम गाईजवळ गेले. गाय हंबरली. वामनभटजींनी तिच्या अंगावरून हात फिरविला. त्यांच्या डोळ्यांतून पाणी आले. तिच्याही आले.

'सावळ्ये आलो हो मी.' ते म्हणाले.

सावळी हंबरली. तिने त्यांचे अंग चाटले.

'दाखवा ना दूध काढून वामनभटजी.' जमलेले लोक म्हणाले.

'अहो, ती भाकड कसले दूध देणार ?' पिलंभटजी म्हणाले.

'परंतु ती वामनभटजींची कामधेनू आहे. बघू या कामधेनूचा महिमा पिलंभटजी, आणा तुमचा पाच शेरांचा लोटा. वामनभटजी, सरसावा पुढे. नाही तर पैज हरलो म्हणा.' लोक टिंगल करीत म्हणाले.

'आणा लोटा.' वामनभटजी म्हणाले.

सारे खो खो हसले. आणखी गर्दी जमली. लहान मुलेमुलीही आली. आयाबायाही जमल्या. सर्वांचे डोळे लागले आणि पिलंभटजी भांडे घेऊन आले. वामनभटजींनी सावळीच्या पाठीवरून प्रेमाचा हात फिरविला.

'सावळ्ये, मी भुकेलेला आहे. मला पोटभर दूध पाज. दोन महिन्यांचा मी उपाशी आहे हो.' असे म्हणून ते दूध काढण्यासाठी बसले. कासेला त्यांनी हात लावला. कास भरून आली. जणू चार समुद्रच चार आचळांत येऊन उभे राहिले.

भांड्यात धार वाजली. भरभर दूध निघू लागले. भांड्यात दुधाच्या धारा भरत होत्या आणि वामनभटजींच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा सुटत होत्या. भांडे भरले!

'दुसरे भांडे आणा पिलंभटजी, दुसरे आणा.' मुले ओरडली.

दुसरे भांडे आले. तेही भरले आणि 'पुरे हो सावळ्ये, पोट भरले,' असे म्हणून वामनभटजी उठले.

'खरी कामधेनू आहे.' आयाबाया म्हणाल्या.

'गाईगुरेही प्रेम ओळखतात.' लोक म्हणाले.

'पिलंभटजी, फुकट तू!' कोणी उपहासाने म्हणाले.

वामनभटजींनी सावळीचे दावे सोडले.

'चल सावळ्ये' ते म्हणाले व निघाले. सावळी पाठोपाठ आली. आपल्या पहिल्या घरी ती आली. वामनभटजींनी तिला चारा घातला, पाणी पाजले. वेदमंत्र म्हणत किती तरी वेळ तिच्या अंगावरून ते हात फिरवीत उभे होते, मानेखालची पोळी खाजवीत होते.

वामनभटजी व त्यांची गाय म्हणजे पालगड गावाची एक कौतुकाची वस्तू होऊन राहिली आहे!

※ ※ ※

सोराब नि रुस्तुम : कथा दुसरी

# पाखराची गोष्ट

फार वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. दूर दूर असलेल्या एका देशातील ही गोष्ट आहे. एक होता शेतकरी. त्याचे नाव होते खंडू. खंडूची बायको होती. तिचे नाव चंडी. चंडी नावाप्रमाणेच खरोखर होती. जणू त्राटिकेचा अवतार. ती सदा संतापलेली असायची. डोळे तारवटलेले, कपाळाला सतराशे आठ्या. घरात अक्षयी तिची आदळआपट चालायची.

खंडूला वाईट वाटे; परंतु काय करणार? घर सोडून जावे असे त्याला वाटे; परंतु तेही बरोबर नाही असे त्याची सदसद्विवेकबुद्धी सांगे. 'तुझी गाठ पडली आहे खरी अशा बायकोशी. आता भिऊन पळू नकोस. सहन कर सारे.' असे सदसद्विवेकबुद्धी म्हणे.

चंडी खंडूजवळ कधी एकही शब्द गोड बोलत नसे. ती सदैव त्याच्या अंगावर ओरडायची, त्याला शिव्या द्यायची, हातात लाकूड घेऊन मारायला यायची. प्रत्यक्ष मारीत नसे एवढेच. शेजारीपाजारी तरी का खंडूला सहानुभूती दाखवीत होते? नाही. तेही हसत, थट्टा करीत.

कोंबडा आरवताच खंडू उठे. तो शेतावर जाई. चंडी त्याला काहीसुद्धा न्याहारीला देत नसे. ना थोडी चटणीभाकर, ना मूठभर पोहे. बारा वाजेपर्यंत उपाशी पोटी तो शेतात काम करी. नंतर भुकेलेला तो घरी येई.

'आला मेला घरी. इतक्यात कशाला आला? का मरत होता उन्हात? मोठा नाजूक की नाही? नखरे करायला हवेत मेल्याला. अजून भाकर भाजून नाही झाली, तो आला गिळायला. बसा ओसरीत आता. हे दाणे निवडा.

नीट निवडा. खंड्या, अरे तुला सांगत्ये मी. घे ते सूप व निवड दाणे. खडादगड पाहून ठेव. नवरोजी झालाय नुसता छळायला.'

असे सारखे तिचे तोंड सुरू असायचे. खंडू घरी दमून भागून आल्यावरही चंडी जे काम सांगे ते तो निमूटपणे करी. मग जी जाडीभरडी कोरडी भाकर चंडी वाढी ती तो खाई.

'कोरडी भाकर कशी खाऊ?' तो म्हणे.

'तर काय बासुंदी आणू? श्रीखंड आणू? भिकारी तर आहे मेला; परंतु ऐट आणतो राजाची. म्हणे कोरडी कशी खाऊ? मला जात नाही कोरडी म्हणून माझ्यापुरते थोडे कालवण केले आहे. तुला रे काय झाले? भरपूर काम करीत नाहीस वाटते शेतात? ज्याला भूक चांगली लागते त्याला चार दिवसांचे शिळे तुकडेसुद्धा साखरेवाणी गोड लागतात. म्हणे कोरडी भाकर कशी खाऊ? घशाखाली जात नाही वाटते? जरा मुसळ सारा घशात व भोक मोठे करा घशाचे. मी म्हणून ताजी भाकर तरी देत्ये करून. दुसरी कोणी सटवी असती, तर चार दिवस तुला उपाशी ठेवती, शिळे खायला घालती. आपले पाय चेपायला लावती. खा कोरडी भाकर. सुखाची मिळते आहे भाकर तीसुद्धा उद्या देव नाही देणार, जर असे कुरकुराल तर.' असे ती म्हणे.

ती तोफ एकदा सुरू झाली म्हणजे खंडू घाबरे. मुकाट्याने भाकर खाई व उठून जाई. मग जरा ओसरीत तो घोंगडीवर अंग टाकी. तो ती हिडिंबा लगेच गर्जत येई.

'पडलेत काय पालथे? जा की शेतात. आळशी आहे मेला. खातो व लोळतो. शेतकरी का असा दिवसा झोपतो? उठा, जा.'

खंडू आता घरी फार बसत नसे. बहुतेक त्याचा वेळ आता शेतातच जाई. दमला तर तेथेच झाडाखाली पडे. त्या दाट छायेच्या एका झाडाखाली उशाला धोंडा घेऊन तो पडे. झाडावर पाखरे गोड गाणी गात असत. ती मधुर किलबिल ऐकून खंडूला आनंद होई. तो मनात म्हणे, 'पाखरे इतके गोड बोलतात. माणसे का बरे गोड बोलत नाहीत? माझी बायको का बरे गोड बोलत नाही? आणि शेजारीही माझा उपहासच का करतात?'

एक नवीनच पक्षी एकदा त्याला दिसला आणि पुढे रोज त्याच्यासमोर तो पक्षी येऊन बसे. नाचे. गोड शब्द करी. खंडूला आनंद देण्यासाठी का ते सुंदर पाखरू येत असे?

एके दिवशी खंडू त्या पाखराजवळ गेला, तो काय आश्चर्य? ते पाखरू पळालं नाही, भ्यायलं नाही. खंडूने त्या पाखराला धरले. त्याने ते पाखरू घरी आणले. एका सुंदर पिंजऱ्यात त्याने ते ठेवले.

खंडू आता त्या पाखरावर जीव की प्राण प्रेम करी. त्याला ताजी फळे घाली. त्याच्या पिंजऱ्यावर हिरवे पल्लव बांधी, फुले बांधी. मोठ्या पहाटे उठून त्या पाखराला तो बोलायला शिकवी.

'ये हो खंडू. दमलास हो. भागलास हो. बस जरा. मी गाणी गातो. तू आनंदी राहा. मी तुला रिझवीन. मी तुझ्याजवळ गोड बोलेन. मी तुला प्रेम देईन. ये हो खंडू.'


असे त्या पाखराला तो बोलायला शिकवी. त्याची ती कजाग बायको त्या वेळेस झोपलेली असे. बायको जागी झाली की, खंडू शेतावर निघून जाई; परंतु शेतावर गेला तरी त्याला त्या पाखराची आठवण येई. डोक्यावर सूर्य आला की, खंडू आता घरी येई. येताना त्या पाखराला ताजी कोवळी कणसे आणी. रानमेवा आणी.

खंडू घरी येताच ते पाखरू पिंजऱ्यात नाचू लागे. गाऊ लागे. ते खंडूचे स्वागत करी व गोड वाणीने म्हणे, 'ये हो खंडू. दमलास हो. बस हो जरा. मी तुला गाणे गाईन. मी गोड बोलेन. ये.' खंडूला ते गोड शब्द ऐकून आनंद होई. तिकडे बायको बडबडत असली तरी खंडू तिकडे लक्ष देत नसे. पाखराची गोड वाणी ऐकण्यात तो तल्लीन होई.

खंडू आता आनंदी असे. त्याच्या आत्म्याला जणू प्रेमामृताचा चारा मिळाला. त्याच्या मनाला सहानुभूतीचे खाद्य मिळाले. भुकेलेला खंडू तृप्त झाला. बायको त्याला भाकर करून वाढी आणि ते पाखरू प्रेम देई. जगात न मिळणारे दुर्मिळ प्रेम.

एके दिवशी खंडू शेतात गेला; परंतु पाखराच्या पिंजऱ्याचे दार उघडे राहिले. इकडे ती चंडी उठली. नवरा गेल्यावर ती गोड गोड करून खायची. आज तिने शिरा करण्याचे ठरविले. ताटात रवा काढला. साखर काढली. एका पातेलीत

तूप घेतले. तिने सारी तयारी केली इतक्यात अंगणात कोणाची गुरे आली म्हणून त्यांना हाकायला ती गेली. इकडे ते पाखरू पिंजऱ्यातून खाली आले. स्वयंपाकघरात गेले. रव्यामध्ये चोच घालून रवा खाऊ लागले. साखरेत चोच मारून साखरेचे कण त्याने खाल्ले. ते पाखरू मेजवानीत रमले. इतक्यात चंडी आली. तिने ते पाहिले. तिला राग आला. ते पाखरू फडफड करून पिंजऱ्याकडे जाऊ लागले; परंतु तिने ते पकडले. ते पाखरू धडपडत होते. केविलवाणे ओरडत होते.



'घालशील पुन्हा चोच? घालशील? आणि त्याच्याजवळ गोड गोड बोलायला हवं नाही? मी पिंजऱ्याजवळ आल्ये तर जीभ जशी झडते मेल्याची. खंड्याजवळ गोड गोड बोलतोस? थांब, तुझी जीभ कापून टाकत्ये. का निखारा ठेवू जिभेवर? नको. कापूनच टाकावी. मग बघत्ये कसा गोड बोलशील तो.'

असे म्हणून तिने खरोखरच कात्री आणली आणि त्या पाखराची चोच उघडून तिने त्याची जीभ कटकन् कापली. तुकडा उडाला. पाखराने किंकाळी फोडली. ची ची केले. अरेरे!

त्या पाखराला त्या चंडीने आता सोडले. ते दीनवाणे पाखरू पिंजऱ्यात जाऊन बसले. त्याला वेदना होत होत्या; परंतु कोणाला सांगणार, कशा सांगणार? त्याची वाणी गेली. त्या पाखराच्या डोळ्यांतून पाणी आले.

दुपारची वेळ झाली. खंडूच्या येण्याची ते पाखरू वाट पाहात होते. खंडू आला. कोवळी कणसे घेऊन आला. फुलांचे तुरे पिंजऱ्यावर लावण्यासाठी घेऊन आला. खंडू पिंजऱ्याजवळ गेला; परंतु पाखरू आज नाचेना, गोड गाणे म्हणेना. 'ये हो खंडू, दमलास हो.' असे म्हणेना. का बरे?

'पाखरा, का रे आज बोलत नाहीस? तूही का रागावलास माझ्यावर? आज मला यायला का उशीर झाला? कालची फळे का आंबट होती, कडवट होती? परंतु मी ती खाऊन पाहिली होती. गोड होती ती. हे बघ फुलांचे तुरे आणले आहेत. का रे? आज असा का? आणि हे तुझ्या डोळ्यांत आज पाणी का? मी तुला पिंजऱ्यात कोंडले म्हणून का तू दुःखी आहेस? तुला का बाहेरच्या स्वातंत्र्याची आठवण झाली? झाडांवर झोके घेण्याची का आठवण झाली? तू वाऱ्यावर बाहेर नाचत असशील. झाडांच्या डहाळ्या टाळ्या वाजवीत असतील, तुझ्या नाचण्या गाण्याला ताल धरीत असतील. होय ना? ते का सारे तुला आज आठवले? का तुझ्या घरची तुला आठवण झाली? तुझी का बायको आहे? तुझी का मुलेबाळे आहेत? कोठे आहे तुझे घरटे? परंतु तुला मी पकडले तेव्हा तू पळाला नाहीस. मला वाटले की, तू माझ्यावर प्रेम करायला आलास आणि खरेच तू आनंदी होतास. आज सकाळी मी जाईपर्यंत तू सुखी होतास! आणि नंतर काय झाले? ती चंडी का तुला बोलली? अरे ती तशीच आहे. तिचे बोलणे नको मनावर घेऊ. बोल. गोड गोड गाणे म्हण. 'खंडू, दमलास हो' असे म्हण. तू माझा आधार. तूही का रागावलास? बोल. राजा, बोल. नाच, गा.' परंतु ते पाखरू मुके झाले होते. थोडीफार हालचाल ते करी; परंतु पुन्हा स्वस्थ बसे. दीनवाणे बसे. खंडू घरात गेला.

'का ग आज पाखरू का बोलत नाही? तू काय त्याला केलेस? त्याला का शिव्याशाप दिलेस? त्याला का मारलेस? ते खिन्न आहे, दुःखी कष्टी आहे. त्याचे डोळे पुन्हा पुन्हा भरून येतात. तू मला बोलतेस, शिव्या देतेस. त्या मुक्या प्राण्याचेही का मन दुखवलेस? त्यालाही का त्रास दिलास? काय केलेस?'

'काय केले ? कापली त्याची जीभ. तुमच्याजवळ गोड गोड बोलते ते पाखरू; मला ते बघवत नव्हते. इतके दिवस मी माझा राग आवरला होता; परंतु आज त्याने माझ्या खाण्याच्या भांड्यात चोच घातली. मी जरा बाहेर गेल्ये, तो पिंजऱ्यातून बेटे खाली आले व बसले खात. जणू मेजवानीच होती त्याला. आला मला राग. धरले, घेतली कात्री व कापली जीभ. ठारच मारणार होत्ये, त्याचा गळाच चरचर चिरणार होत्ये, परंतु आजच नको म्हटले. बोल म्हणावे आता कसे गोड बोलतोस ते. मी पिंजऱ्याजवळ कधी गेल्ये तर एक आवाज काढीत नसे. तुम्हाला पाहून ते हसे, नाचे, गाणे म्हणे. माझ्यावर जणू खप्पा मर्जी. टाकली जीभ कापून. खंड्या, आता कोण रे गोड बोलेल तुझ्याजवळ ? त्या पाखराची पूजा करीत होतास. त्याला फुलांचे तुरे आणीत होतास; परंतु माझ्या केसांत घालण्यासाठी आणलीस का कधी फुले ?'

'नव्हतो का एके काळी आणीत ? परंतु तू ती कुस्करून टाकीत असस. पायांखाली चिरडून टाकीत असस. मग आणणे मी बंद केले.'

'मी तुझे सत्त्व पाहात होत्ये खंड्या. देवी एकदम नाही प्रसन्न होत. जा त्या पाखराकडे. ते रडत आहे, तू रड. जा, नीघ.'

खंडू खरेच पिंजऱ्याजवळ आला. त्या पाखराकडे दुःखाने पाहात राहिला. बराच वेळ विचार करून खंडू त्या पाखराला म्हणाला, 'पाखरा, तुला मी आज सोडूनच देईन हो. तुला मी आणले हीच चूक. पाखरांची झाडांवरच शोभा. झाडांवरचीच त्यांची गाणी ऐकावी. मन रिझवून घ्यावे. उगीचच तुला आणले व कोंडले. आज तिने जीभ कापली, उद्या तुझा गळाही ती कापील. ती राक्षसीण आहे. अगदी राक्षसीण. पाखरा, जा हो. सोड मला. मी अभागीच आहे. मला एकट्यानेच राहिले पाहिजे. फार तर सृष्टीची दुरून मिळेल ती संगत घ्यावी. फुलांची, पाखरांची, झाडामाडांची, डोंगरटेकड्यांची, नद्यानाल्यांची, गाईगुरांची दुरून संगत. मेघांची, ताऱ्यांची, थंडीपावसाची, ऊनवाऱ्याची हीच संगत. खरे ना ? होय. ही सृष्टीतील संगत मी घेत जाईन. तुला सोडतो हो आज; परंतु तुझे जातभाई तुला मारणार नाहीत ना ? तू दास्यात जिवंत राहिलास म्हणून तुला चोची नाही ना मारणार ? नाही मारणार. कारण तू उपकारासाठी कैदी झालास. एका दुःखी माणसाला आनंद देण्यासाठी तू आपखुषीने आलास. तुझे भाईबंद तुझ्यावर रागावणार नाहीत. तुझे स्वागत

करतील. तुझी मुलेबाळे, तुझी बायको तुझ्यावर अधिकच माया करतील. जा पुन्हा प्रेमळ घरट्यात, डोल फांद्यांवर, पोह आकाशात, खा रानचे मेवे. जा हो पाखरा. आज मी मुक्त करीन हो तुला.'

असे तो बोलत होता, तो आतून घसरा आला. 'या गिळायला. भाकर झाली आहे.' खंडू गेला. त्याच्याने आज खाववले नाही. पाखराला आज खाता येत नव्हते. पाखराची जीभ दुखत होती. खंडूला खाणे का गोड लागेल? दोन तुकडे खाऊन तो उठला. पाणी प्यायला. हातात पिंजरा घेऊन तो शेतावर गेला. त्या गर्द छायेच्या झाडाखाली बसला. त्याने पिंजऱ्यातून ते पाखरू बाहेर काढले. त्याने ते प्रेमाने हृदयाशी धरले. अश्रूंनी त्याला त्याने न्हाऊ घातले. पाखराने चोच वर केली. दोन अश्रू ते प्यायले; परंतु ते पाणीही त्याच्या जिभेला झोंबले.

'पाखरा, जा हो आता. जा लांब उडून. येथे शेतावरही नको येऊस. एखादे वेळेस ती येईल. तुला मारील. लांब बनात जा. पूर्वेच्या बाजूला एक बन आहे. त्यात एक सदैव वाहाणारा झरा आहे. बांबूची, कळकीची उंच बने आहेत. जा तेथे. सुखात राहा. तुझी मला आठवण आहे. मी तुला विसरणार नाही. माझ्या हृदयात तुझ्यासाठी घरटे आहे. त्या घरट्यात तुझी मनोमय मूर्ती सदैव राहील. मुकी गाणी ती गाईल हो. जा.'

पाखराला जणू ती वाणी समजली. ते उडाले. पुन्हा एकदा येऊन, खंडूसमोर जरा नाचून, त्याच्या डोक्यावर घिरट्या घालून ते गेले. खंडू पाहात होता. पूर्वेकडच्या बाजूला ते उडाले. ते दमले. एका झाडावर ते बसले. पिंजऱ्यात बसून त्याच्या पंखांची शक्ती कमी झाली होती; परंतु ते पाहा पुन्हा उडाले. निळ्या निळ्या आकाशातून उडत चालले. खंडू पाहात होता. ते पाखरू दिसेनासे झाले. खंडू पुन्हा काम करू लागला.

काही दिवस गेले. काही महिने गेले. एके दिवशी खंडू शेतावर न जाता, पूर्वेकडच्या बनाकडे वळला. ते पाखरू दृष्टीस पडावे, पुन्हा एकदा भेटावे म्हणून त्याचा जीव आसावला होता. ते पाखरू म्हणजे त्याच्या पंचप्राणातील जणू एक प्राण बनले होते.

तो चालला बनातून. झाडांकडे तो पाहात होता. पाखरांकडे तो पाहात होता; परंतु ते पाखरू त्याला कोठे दिसेना. खंडू निराश न होता चालला

पुढे आणि तो खळखळ वाहाणारा झरा आला. कसे स्वच्छ स्फटिकासारखे पाणी! जणू वनदेवता त्यात आपले तोंड पाही. वनदेवतेचा जणू तो आरसा. रानातील पशुपक्ष्यांचा जणू तो आरसा!

खंडू त्या झऱ्यातले पाणी प्यायला. त्याच्या काठाने तो पुढे चालला. तीरावर ओलाव्याने रानफुले फुलली होती. नाना रंगांची फुले. पांढरी, पिवळी, निळी, लाल, नाना छटांची, नाना आकारांची. काही चिवटीबावटीही होती आणि ती पाहा फुलपाखरे नाचत आहेत. या फुलावरून त्या फुलाकडे जात आहेत. ती फुलपाखरे फुलांचे संदेश पोचवीत होती. फुलांचे टपालवाले जणू. का ती फुलपाखरे म्हणजे छोटे पतंग होते? बिनदोरीचे पतंग; परंतु कोण उडवीत होते त्यांना?

खंडू ती सारी मौज पाहात होता; परंतु तेथे तो थांबला नाही. त्याचे लक्ष फुलांकडे नव्हते. फुलपाखरांकडे नव्हते, झऱ्याकडे नव्हते. ते आपले पाखरू केव्हा कोठे भेटेल असे त्याला झाले होते.

ती पाहा वेळूची बने आली. कळकीची बने, उंचच उंच. जणू उंच वाढलेले रसहीन ऊसच. वारा त्या बनांतून खेळत होता. गोड आवाज येत होता. ते वेळू म्हणजे निसर्गाचे का वेणू होते?

'येथेच असेल ते पाखरू,' खंडू म्हणाला. तो चौफेर पाहात होता. तेथे एका शिलाखंडावर तो बसला. दुपार होत आली. पाखरे घरट्यात चालली. जरा विश्रांती घ्यायला. पिलांना घास द्यायला ती घरट्यात आली. झाडांवर मंजुळ किलबिल होत होती.

अरे, ते पाहा खंडूचे पाखरू. ते पाहा जात आहे. खंडूने शीळ वाजवली, टाळी वाजवली.

'पाखरा ये ये. हा बघ खंडू आला आहे. दमलास का म्हण. ये.' पाखराने ते शब्द ओळखले. ते पाखरू खंडूजवळ आले. ते नाचले. ते गाऊ लागले.

'अरे, तुझी जीभ तुटली ना होती? गाणे कसे गातोस? आवाज कसा काढतोस?' खंडूने विचारले.

'माझी वाणी परत आली. इतकेच नव्हे, तर मला माणसांसारखे सारे बोलता येते. आकार पाखराचा, परंतु तुमच्यासारखे सारे बोलतो. खंडू, तुला पाहून मला खूपच आनंद होत आहे. तू माझ्यावर प्रेम केलेस. आज माझ्या घरी

तू आला आहेस. माझा पाहुणचार घे. त्या वेळूच्या बनात आमचे मोठे घरटे आहे. माझी मुलेबाळे तेथे आहेत. बायको तेथे आहे. त्या सर्वांना मी घेऊन येतो. तुझे दर्शन होईल त्यांना. तुझ्या कितीतरी गोष्टी त्यांना मी सांगत असतो. बस हो येथे. जाऊ नको.'

असे म्हणून ते पाखरू उडाले. ते आपल्या घरट्यात गेले. पिले चिव चिव करीत त्याच्याभोवती आली. बायकोने त्याचे स्वागत केले.

'बाबा, बाबा, आज का उशीर केलात? आम्हाला भूक लागली.' पिले म्हणाली.

'खरेच, कोठे गेले होतेत आज लांब फिरत?' बायकोने विचारले.

'रोजच्यासारखा वेळेवर मी येत होतो; परंतु माझा तो मानव मित्र आज येथे आला आहे. त्या झाडाखाली बसला आहे. त्याच्याजवळ मी बोलत होतो. म्हणून मला उशीर झाला. चला. तुम्हाला मी तो दाखवतो. माझ्यावर त्याचे किती प्रेम. मला शोधीत शोधीत तो आला. आज आधी त्याला जेवण. चला सारी. करू त्याचे स्वागत. येता ना?' पाखराने विचारले.

'हो बाबा, चला.' पिले म्हणाली.

'चला. मीही त्याला पाहीन.' बायको म्हणाली.

ते पाखरू निघाले. बरोबर पिले होती. पत्नीही आली. सारी त्या खंडूजवळ आली. पिले नाचू लागली. पत्नीने प्रणाम केला.

'ही माझी पत्नी, ही माझी पिले.' पाखरू म्हणाले.

'वा! आनंदी आहे तुझे कुटुंब.' खंडू म्हणाला.

'माझी पत्नी गोड बोलते, मी घरी येताच माझे स्वागत करते. पिले माझ्याभोवती नाचतात. मी त्यांना गोड गाणी शिकवतो. म्हणा रे गाणी. बाळांनो, सोनुकल्यांनो, म्हणा गाणी. खंडूचे स्वागत करा.' पाखराने सांगितले.

पिले गाऊ लागली. मानवी वाणी असलेल्या त्या पाखरानेच ती गाणी रचली होती. सुंदर अर्थाची गाणी. काय होता त्यांत अर्थ?

'जगात नाही मित्र मिळाले तरी सृष्टीत आहेत. आपल्या घरी नाही मिळाले तरी बाहेर आहेत. देवाने आधीच तुम्हाला मित्र दिले आहेत. हे निळे निळे अनंत आकाश. ते नेहमी तुमच्यावरच पाखर घालील. तारे तुम्हाला रमवतील. नद्या पाणी देतील. वारे गाणी गातील. फुले सुगंध व सौंदर्य देतील. वृक्षलतावेली

तुमच्यासमोर डोलतील, नाचतील. फार दुःख नका करू. कोणी शिव्याशाप दिले तरी वाईट नका वाटून घेऊ. या निसर्गाकडे पाहा व आनंदी राहा.'

'आनंद आनंद! हृदयात आनंद असला म्हणजे मन कसे हलके होते! ते मग चिखलात न पडता उंच उंच उडते. देवाजवळ जाते. हसा व देवाजवळ जा. आनंदी व्हा व प्रभूजवळ जा.'

'दुःख? होय. दुःख आहे; परंतु ते का आहे? आपणच ते निर्मितो व मग रडतो. चला, दुःख दूर करू. सर्वांजवळ गोड बोलू. सारे मिळून खाऊ, सारे मिळून राहू. भांडण नको, मत्सर नको. आपल्यासारखेच सारे सर्वांना द्या. झाडे आपली फळे देतात. मेघ आपले पाणी देतात. फुले आपला सुगंध देतात. सूर्य प्रकाश देतो. आपणही देऊ. सारे सुखी राहू. म्हणजे मग आनंद होईल!'

अशी ती गाणी होती. एक गाणे तर फारच छान :

'नाचा, नाचा, नाचा. वाऱ्यावर नाचा. प्रकाशकिरणांवर नाचा. लाटांवर नाचा. डोंगरावर नाचा. भावनांवर नाचा. आनंदावर नाचा. सारी सृष्टी नाचत आहे. पृथ्वी सूर्याभोवती नाचते. चंद्र पृथ्वीभोवती नाचतो. नाच, विराट नाच. नाचा, नाचा.'

'कशी आहेत गाणी?' पाखराने विचारले.

'छान आहेत. आमच्यामध्ये अशी नाहीत आणि तुझी पिले म्हणतातही छान.' खंडू म्हणाला.

'बाळांनो, जा. पळसाची ताजी पाने आणा आणि गोड गोड फळे घेऊन या. खंडूला भूक लागली असेल. जा.' पाखरू म्हणाले.

पिलांनी पळसाची पाने आणली. बायकोने चोचीत धरून रसाळ फळे आणली. पेरू होते. अंजीर होते. पिस्ते होते. रानातील नाना प्रकारचे मेवे होते. त्या पानांवर ती फळे वाढण्यात आली.

'खंडू, कर फलाहार. पोटभर खा.' पाखरू म्हणाले.

खंडू फळे खाऊ लागला. त्याने त्या पिलांना 'घ्या' म्हटले.

ती म्हणाली, 'नको, मग आम्ही खाऊ.'

'अरे, तुम्ही लहान. घ्या हो.' खंडू म्हणाला.

'घ्या हो.' पाखरू म्हणाले.

असे म्हणत तो चालला होता.

गाडी घरी आली. बाप वाटच पाहात होता.

'जयंता, काय आणलेस?' त्याने विचारले.

'गाडीत आहे ते घ्या,' तो म्हणाला. बापाने गाडीत पाहिले. तो दोन सोन्याचे दगड. बापाचे डोळे दिपले. ते सोन्याचे दगड घरात नेण्यात आले. बापाला अत्यानंद झाला.

'कोणी दिले हे दगड?'

'ज्यांनी माल घेतला होता त्यांनी.'

जयंताचे सर्वांनी कौतुक केले; परंतु ते सोन्याचे दगड एका बाहेरच्या माणसाने पाहिले होते. तो त्या सावकाराकडे आला व म्हणाला, 'माझा सोन्याचा एक दगड तुमच्याकडे आला आहे. मुकाट्याने द्या. नाही तर राजाकडे फिर्याद नेईन. घराची झडती घेववीन.'

सावकाराने एक दगड आणून त्याला दिला; परंतु त्या माणसाने तो घरी नेताच पुन्हा तो केवळ दगड दिसू लागला. कोठे आहे सोने? हा तर दगड. तो माणूस मनात म्हणाला, 'जयंता वेडबंबू दिसतो. आणि बापही बावळट दिसतो; परंतु दगड सोन्यासारखा दिसत तर होता. जाऊ द्या. पुन्हा दगड होणारे सोने काय कामाचे?'

जयंता आनंदात होता आणि आता ती मोठी यात्रा येणार होती एका गावी. ते प्रसिद्ध तीर्थक्षेत्र होते. लाखाची यात्रा तेथे जमे. त्या वेळी दूरदूरची शेकडो दुकाने तेथे येत! सारे राष्ट्र तेथे जमे. यात्रा म्हणजे राष्ट्राच्या संसाराचे संमेलन, यात्रा म्हणजे सर्वांचे मीलन-स्थान.

'जयंता, त्या यात्रेत जातोस का माल घेऊन? जा भरपूर माल घेऊन.' बापाने सांगितले.

'होय बाबा, जाईन.' जयंत म्हणाला.

'एके दिवशी पाच-पन्नास गाड्या जायला तयार झाल्या. त्यांच्यांत माल भरण्यात आला. जयंता निघाला. ते यात्रेचे ठिकाण आले. जयंताने पाल लावले. सारा माल तेथे त्याने मांडला. गाड्या परत गेल्या. यात्रा भरली. राव रंक सारे आले. जिकडेतिकडे गर्दी.

जयंताच्या दुकानात कोणाची ही गर्दी ? हे श्रीमंत लोक नाहीत. हे सारे गरीब लोक आहेत. ह्या पाहा आयाबाया. अंगावर चिंध्या, उघडी मुले कडेवर. जयंता त्यांना फुकट कापड देत होता. त्या दुवा देऊन जात होत्या.

'दादा, फुकट घेऊ नये परंतु आमच्याजवळ काही नाही,' त्या आयाबाया म्हणत.

'तुम्ही फुकट नाही घेत. किंमत भरपूर देत आहात.' जयंता म्हणे.

'कोठे रे दिली किंमत ?'

'तुमचे आशीर्वाद हीच किंमत. मनापासूनचा मिळालेला आशीर्वाद म्हणजे अमोल वस्तू आहे.'

जयंताचे दुकान खलास झाले. तो आता बाजारात हिंडू लागला. यात्रा पाहू लागला. तो हजारो लोकांना नीट खायला नाही असे त्याने पाहिले. भावभक्तीने लोक यात्रेला आले; परंतु जवळ ना खायला ना प्यायला.

जयंता हा लक्षाधीश सावकाराचा पुत्र होता. त्याच्या दिलाची सर्वत्र प्रसिद्धी होती. जयंताने तेथील सावकारांकडून कर्ज काढले आणि एक मोठा रसोडा त्याने उघडला. कोणीही यावे व जेवून जावे अशी पाटी रसोड्यावर लावण्यात आली. मग काय विचारता ? हजारो लोकांच्या झुंडी त्या रसोड्याकडे चालल्या. पंगतीवर पंगती उठू लागल्या. जयंताला मुलाबाळांचे, गरीब आयाबायांचे आशीर्वाद मिळत होते. 'अन्नदाता सुखी भव,' असे हजारो लोक मनापासून म्हणत होते. त्या सुखी लोकांच्या तोंडावरचे समाधान पाहून जयंताला मोक्ष मिळाला असे वाटे. यात्रा संपली. लोक परतले.

जयंता आपल्या घरी आला.

'काय जयंता ? सारा माल खपला वाटते ?'

'हो.

'पैसे ?'

'उधारीने सारा माल विकला.'

'अरे यात्रेला आलेले लोक. त्यांचा का ठावठिकाणा असणार ? दाही दिशातून आलेले लोक. ते कोठे भेटणार ? त्यांची ओळख कशी राहाणार ? कसा तू मूर्ख ?'

'बाबा, तुमचे पैसे मी परत देईन. जेव्हा लागतील तेव्हा सांगा.'

बाप बोलला नाही. सोन्याचे दगड आणून देणारा जयंता काय चमत्कार करील कोणी सांगावे? परंतु थोड्या दिवसांनी त्या तीर्थक्षेत्रीच्या सावकारांकडून पत्रे आली.

'जयंता, सावकारांकडून कशाला घेतलेस पैसे?'

'लोकांना जेवू घालण्यासाठी. लोक उपाशी मरत होते. मला पाहावेना. जवळ पैसे नव्हते.'

'अरे, तू मांडले आहेस तरी काय? या सावकारांची एक कवडीही मी देणार नाही.'

जयंतच्या वडिलांनी तसे त्या सावकारांस लिहिले. ते सावकार रागावले. ते जयंताच्या वडिलांकडे आले.

'अहो, तुमच्या पतीवर आम्ही तुमच्या मुलाला पैसे दिले. तुम्ही नाकाराल हे आम्हाला नव्हते माहीत.' ते सावकार म्हणाले.

'परंतु दुकानातील माल सर्वांना उधार वाटणारा पोरगा काय किंमतीचा हे तुम्हाला समजले पाहिजे होते. मी या कर्जाला जबाबदार नाही. तो जयंता व तुम्ही काय वाटेल ते करा.'

'काय रे जयंता, पैसे दे आमचे.' सावकार म्हणाले.

'आणि-जयंता, उधारीचे पैसेही घेऊन ये. जा दाही दिशांत. शोध कोणाला कापड दिलेस ते. जा. हो चालता.' बाप म्हणाला.

'सावकारांनो, उद्या मी उत्तर देईन. तुमचे पैसे तरी देईन नाही तर माझे प्राण तरी देईन.' असे म्हणून जयंता आपल्या खोलीत गेला. तो आपल्या अंथरुणावर रडत होता. काय करावे ते त्याला सुचेना. रात्र झाली तरी तो उठला नाही. जेवायला गेला नाही. त्याची आई त्याला हाक मारायला आली.

'जयंता, चल ना रे जेवायला. दोन घास खा. ऊठ.'

'नको जेवण. नको काही. बाबांचे पैसे देईन तेव्हा येथे खाईन. उगीच त्यांच्या पैशांतून कशाला खाऊ?'

'हे रे काय? ऊठ. तू नाही आलास तर मीही उपाशी राहीन.'

जयंता उठला. खाली गेला. दोन घास खाऊन पुन्हा खोलीत अंथरुणावर पडला. त्याला झोप लागली आणि झोपेत एक स्वप्न पडले. कसले स्वप्न?

सुंदर असे देवाचे स्वप्न. स्वप्नात एक तेजस्वी पुरुष त्याच्याकडे आला व त्याला म्हणाला, 'जयंता, धीर नको सोडू. जो गरिबांना जवळ घेतो, त्याला देव जवळ घेतो, तू देवाचा लाडका झाला आहेस. सारी त्रिभुवनातील संपत्ती तो तुला देईल. उद्या सकाळी उठल्यावर तुझ्या वडिलांना व त्या सावकारांना तू सांग, 'चला माझ्याबरोबर, देतो पैसे.' ते निघतील तुझ्याबरोबर. समुद्रकाठी जा आणि समुद्रात शिरा. भिऊ नका. तुम्हाला खांद्याइतके पाणी होईल. पुढे पुढे या आणि मग एक मोठे तळे लागेल. मोतीपोवळ्यांचे तळे. हिरेमाणकांचे तळे. त्यांना सांग, 'न्या वाटेल तितकी संपत्ती.' समजलास ना? रडू नकोस.' असे संबोधून व जयंताच्या लवलेल्या मस्तकावर हात ठेवून तो दिव्य पुरुष दिसेनासा झाला. स्वप्न संपले व जयंता जागा झाला. केव्हा एकदा उजाडते याची तो वाट पाहात होता.

पहाट झाली. दूरच्या मंदिरातील चौघडा वाजू लागला. पाखरांचीही किलबिल सुरू झाली. जयंता उठला. त्याने शौचमुखमार्जन केले. स्नान केले. देवाचे चिंतन केले. आईच्या पाया पडला आणि पित्याकडे गेला.

'बाबा, चला माझ्याबरोबर. त्रिभुवनातील संपत्ती तुमच्यासमोर ओततो. चला. ते सावकारही बरोबर घ्या. चला.' जयंता म्हणाला.

'चावट आहेस.' पिता म्हणाला.

'चावटपणा नाही. खरेच सांगतो. तुमचीच शपथ.'

पित्याला वाटले, असेलही चमत्कार. तो निघाला. ते सावकारही निघाले. कितीतरी दिवस ते जात होते. वाटेत एक साधू भेटला त्यांना.

'साधूमहाराज, कोठे जाता?' पित्याने विचारले.

'आम्ही विश्वसंचारी. जगभर हिंडतो.'

'तुम्ही दगडाचे सोने झालेले पाहिले आहे?'

'जगात नाना चमत्कार आहेत आणि ज्याच्यावर देवाची कृपा त्याला काय कमी? तुम्ही थोडे दिलेत तर देव अपार देतो. तुला एक गोष्ट सांगू? ऐक.

एकदा एक भिकारी भीक मागत जात होता. काखेला त्याची झोळी होती. इतक्यात शंखांचे आवाज, दुंदुभींचे आवाज कानी आले. कोण येत होते? राजाधिराज येत होता. चराचरांचा स्वामी सोन्याच्या रथात बसून येत होता. हिरेमाणके उधळीत येत होता. दरिद्री, भिकारी लोक वेचीत होते. जगाचे दैन्य

दूर करीत राजाधिराज येत होता. आमचा भिकारी वाट पाहात होता. 'राजाधिराजाचा रथ आपल्याजवळ येईल व तो माणिकमोती उधळील. ती आपण वेचू. जन्माची ददात जाईल,' असे तो मनात म्हणत होता आणि तो रथ धडधड करीत आला. रथाला चन्द्रसूर्यांची जणू चाके होती. वाऱ्याचे जणू वारू होते. दिव्य रथ. भिकारी थरथरत उभा होता. आशेने उभा होता; परंतु तो राजाधिराजच रथातून खाली उतरला. तो त्या भिकाऱ्याजवळ गेला व म्हणाला, 'मला भीक घाल ? दे तुझ्या झोळीतील काही तरी.' भिकारी लाजला, शरमला. ही काय थट्टा, असे त्याला वाटले. अशा ब्रह्मांडाधिपतीने माझ्यासमोर का हात पसरावा ? परंतु त्याने हात पसरला आहे खरा. देऊ दे काही. असे मनात म्हणत त्या भिकाऱ्याने झोळीत हात घातला. त्याने झोळीतील एक अत्यंत लहानसा बारीकसा दाणा काढून त्या राजाधिराजाच्या हातावर ठेवला. राजाधिराज हसला. रथात बसून निघून गेला. तो भिकारी निराश झाला. माणिकमोत्यांची वृष्टी नाही. दुर्दैवी आपण. असे म्हणत तो आपल्या घरी आला. त्याने भिक्षेचे धान्य जमिनीवर ओतले, तो त्या धान्यात एक सोन्याचा दाणा चमकला ! भिकारी चकित झाला. 'मी एक दाणा दिला, म्हणून त्याने हा सोन्याचा मला दिला. अरेरे, मी त्याला सारे धान्य दिले असते तर ?' असे त्या भिकाऱ्याला वाटले. संपली गोष्ट. गोड गोष्ट. छान आहे की नाही ? जे काही थोडेफार देवाला तुम्ही द्याल, या दुःखी दुनियेला द्याल, ते अनंतपट होऊन तुम्हाला परत मिळेल. अहो, पेरलेला एक दाणा हजार दाण्यांचे कणीस नाही का घेऊन येत ?'

'साधूमहाराज, सुंदर सांगितलीत गोष्ट.' जयंता म्हणाला. तो साधू निघून गेला. जयंता, त्याचे वडील व ते सावकार जाता जाता एकदाचे समुद्रकाठी आले. तो अपरंपार समुद्र उचंबळत होता. जणू जयंताला हृदयाशी धरण्यासाठी हजारो हातांनी पुढे येत होता.

'बाबा, चला आता समुद्रात. चला माझ्याबरोबर. सावकारांनो, चला माझ्याबरोबर. घाबरू नका. भिऊ नका. मी बरोबर आहे. भीती नाही. छातीइतके फार तर पाणी होईल. चला, मोत्यापोवळ्यांच्या राशी तुम्हाला देतो. हिरेमाणकांच्या खाणी दाखवतो. चला.' असे म्हणून जयंता समुद्रास प्रणाम करून पाण्यात शिरला. तो बापाला व सावकारांना बोलावीत होता. हळुहळू

तेही शिरले पाण्यात. घो घो लाटा वाजत होत्या. सों सों वारा वाहत होता. चालले सारे पाण्यातून. कमरेइतकेच पाणी. चालले पुढे. आता समुद्र शांत होता. घो घो लाटा नव्हत्या. निळे निळे पाणी. चालले पुढे. तो दूर प्रभा दिसली. समुद्राचे पाणी हिरवे निळे दिसत होते. कोठे लाल छटा होती. सुंदर देखावा, अपूर्व देखावा.

ते सारे त्या विशिष्ट जागेपाशी आले. तेथे मोत्यांच्या वेली होत्या. मोत्यांचे घड लोंबत होते. किती रमणीय व कमनीय ती मोत्ये! आणि त्या पाहा पोवळ्यांच्या वेली, गुलाबी नयनमनोहर पोवळी आणि पलीकडे ते इंद्रनील मणी आणि या बाजूला पाचू. शेकडो छटा आसपास प्रतिबिंबित होत होत्या. त्या सर्वांचे डोळे दिपले. ती संपत्ती पाहून जयंताचा पिता व ते सावकारही चकित झाले.

'बाबा, घ्या तुमचे पैसे. जितके पैसे मी देणे असेन तितक्यांची घ्या संपत्ती. घ्या मोती - पोवळी, घ्या हिरे - माणके. सावकारांनो, बघता काय? लुटा संपत्ती. कोणी बोलणार नाही. घ्या.' जयंता सांगत होता.

'जयंता, परमेश्वराची तुझ्यावर कृपा आहे. नाही तर समुद्रातून आपण कसे आलो असतो? ही सागरसंपत्ती समोर कशी दिसली असती? तुझी धन्य आहे जयंता. तू गरिबांची पूजा केलीस. दरिद्रीनारायणाची सेवा केलीस. परमेश्वराला ते पावले. तू आमचे डोळे उघडलेस. चल, माघारी जाऊ. आजपासून संपत्तीचा उपयोग कसा करावा ते आम्ही शिकलो. आम्ही जनतेच्या संपत्तीचे विश्वस्त आहोत. आमच्याजवळची संपत्ती आमची नाही. ती श्रमणाऱ्यांची आहे. ती दरिद्रीनारायणांची आहे. ती त्यांना आम्ही दिली पाहिजे. त्यांना सुखी केले पाहिजे. जयंता, तुझ्यामुळे आम्ही धन्य झालो. आम्ही माणसे झालो आज. जणू माकडे होतो. आज आम्हाला माणुसकी आली. चल बाळ.' असे ते सावकार म्हणाले. पिता तर आनंदाश्रू ढाळीत होता. ते सारे निघाले. ते सावकार आपल्या तीर्थक्षेत्राला गेले. जयंता व त्याचे वडील आपल्या घरी आले. ती गोष्ट सर्वत्र पसरली. जयंताची कीर्ती सर्वत्र गेली.

पुढे जयंता आणखी मोठा झाल्यावर सर्व संपत्तीचा मालक झाला. त्याचे वडील वारले. पुढे आईही वारली. जयंताने लग्न केले नाही. तो जगाचा संसार करीत होता. स्वार्थाऐवजी परमार्थ साधीत होता. पित्याची सारी संपत्ती त्याने

सेवेत खर्च केली. सर्वांची ददात त्याने दूर केली. 'उदारांचा राणा' असे लोक त्याला म्हणत. कोणी त्याला दीनबंधू म्हणत, प्रेमसिंधू म्हणत.

जयंता पुढे मरण पावला. सारी दुनिया हळहळली, पशुपक्षी हळहळले. दगडधोंडे रडले. जयंताच्या गोष्टी त्या प्रांतात अद्याप ऐकू येतात. त्याचे पोवाडे म्हटलेले ऐकण्यात येतात.

कितीतरी वर्षे झाली; परंतु जयंताची कीर्ती कायम आहे. त्याचे उदाहरण जगाला स्फूर्ती देत आहे, मार्ग दाखवीत आहे. जीवनाचे सोने कसे करावे याची जादू जयंताचे आदर्श जीवन शिकवीत आहे. जयंता उदारांचा राणा झाला. आपणही थोडेफार उदार होऊ या.

※ ※ ※

सोराब नि रुस्तुम : कथा चौथी

# सोराब नि रुस्तुम

इराण देशाच्या इतिहासातील ही करुणगंभीर कथा आहे. या कथेवर महाकवींनी महाकाव्ये लिहिली आहेत. करुण व वीर रसाने भरलेली ही कथा. रुस्तुम इराणच्या राजाच्या पदरी होता. रुस्तुम हा महान योद्धा होता. त्याच्यासारखा वीर झाला नाही. तो बलभीम होता. लोक कौतुकाने म्हणायचे, 'रुस्तुम मुठीने पर्वताचे चूर्ण करील, रविचंद्र धरून आणील.' खरोखरच त्याची शक्ती अचाट होती. सिंहाला तो धरून ठेवी. एक थप्पड मारून त्याची गोगलगाय बनवी. माजलेल्या हत्तीला तो ची ची करीत पळवून लावी. रुस्तुम इराणचे भूषण होता.

तो धिप्पाड पहाडासारखा दिसे. त्याचे ते मांसल खांदे, रुंद छाती, पीळदार दंड, भरदार मांड्या पाहून जणू हा मूर्तिमंत सामर्थ्य आहे असे वाटे. द्वंद्वयुद्धात त्याच्यासमोर कोणी टिकत नसे. सूर्यासमोर का काजवा टिकेल? सागरापुढे का थिल्लर गर्जेल? हंसाबरोबर का कावळा उडेल?

असा हा बलभीम रुस्तुम राजाचा आवडता होता. त्याला काही कमी नव्हते; परंतु रुस्तुम सुखी नव्हता. कोणते होते त्याला दुःख, कोणती होती चिंता? रुस्तुमला मुलगा नव्हता. आपणाला मुलगा व्हावा असे त्याला फार वाटे. आपल्याला मुलगा झाला तर त्यालाही बलभीम करायचे, अजिंक्य वीर बनवायचे असे तो म्हणे.

बऱ्याच वर्षांनी रुस्तुमची चिंता दूर झाली. तो आनंदी दिसू लागला. त्याच्या पत्नीला काही दिवस गेले; परंतु मुलगा होणार की मुलगी? देवाला माहीत. रुस्तुमची पत्नी बाळंतपणासाठी माहेरी जाणार होती. पतीपत्नी बोलत होती.

'तुला मुलगा झाला तरच परत ये. मुलगी झाली तर मला तोंड दाखवायला येऊ नकोस. मला मुलगा पाहिजे आहे. माझी परंपरा पुढे चालवणारा मुलगा घेऊन ये. मी त्याला अद्वितीय वीर करीन. महान योद्धा करीन. मुलगा झाला म्हणजे त्याच्या दंडात हा ताईत बांध. पित्याच्या प्रेमाची खूण. समजलीस ना ? तुझी मी वाट पाहात बसतो. न आलीस तर समजेन की मुलगीच झाली. मग मीही घरात राहाणार नाही. मी रानावनात निघून जाईन.'

'परंतु मुलगी झाली म्हणून काय झाले ? मुलीचा जन्म का वाईट ? मुलीच माता होतात. वीरांना जन्म देतात. मुलगी का कमी योग्यतेची ?' पत्नीने विचारले. 'मला वाद करायचा नाही. मला पुत्र हवा आहे. माझ्या मांडीवर मुलगा दे. माझ्या मांडीवर मुलगी नको. समजलीस ?'

असे म्हणून रुस्तुम उठून गेला. पत्नी माहेरी गेली. जरा उतारवयात बाळंतपण आलेले. चिंता वाढत होती. आईबाप मुलीची काळजी घेत होते. एके दिवशी पहाटे रुस्तुमची पत्नी प्रसूत झाली. तिकडे सूर्य वर आला आणि इकडे बाळ जन्माला आले. या बाळाची कीर्ती का सर्वत्र पसरेल ? सूर्याचे किरण सर्वत्र आनंद देत जातात तसे या बाळाचे नाव का जगभर सर्वांना आनंद देत जाईल ?

मुलगा झाला होता. मातेला अपार आनंद झाला होता. पतीची इच्छा आपण पूर्ण केली असे तिला वाटत होते. तिने त्या बालकाच्या कोवळ्या दंडाला तो ताईत बांधला व 'उदंड आयुष्याचा हो' असा आशीर्वाद दिला.

तिचे आईबाप मुलगा झाला म्हणून रुस्तुमला निरोप पाठवणार होते; परंतु मुलाच्या आईच्या मनात निराळेच विचार आले. ती आपल्या आईबापांस म्हणाली, 'नका कळवू मुलगा झाला म्हणून. रुस्तुम कठोर आहे. उग्र आहे. तो मुलाला माझ्या जवळून नेईल. आपला मुलगा मोठा वीर व्हावा अशी त्याची इच्छा आहे. तो त्याला लहानपणापासून युद्धकला शिकवू लागेल. मुलाने काटक व्हावे म्हणून तो प्रयत्न करील. मला भय वाटते. रुस्तुमची महत्त्वाकांक्षा, परंतु मुलाचे प्राण जायचे एखादेवेळेस. त्याला तो रानावनात नेईल. सिंहवाघांजवळ लढायला लावील. त्याला तरवार, भाला, गदा, तोमर वगैरे शिकवू लागेल.

मला भय वाटते. रुस्तुमला काहीच कळवू नका. तो समजेल, मुलगी झाली म्हणून. माझा बाळ इकडे वाढू दे. एके दिवशी तो पित्याला मग भेटेल.'

मुलीचे बोलणे आईबापांना पसंत पडले. रुस्तुम वाट पाहात होता. बरेच दिवस झाले. पत्नी मुलाला घेऊन आली नाही यावरून मुलगा नाही झाला असे त्याने ताडले. तो खिन्न झाला. तो आपली सर्व शस्त्रविद्या आपल्या मुलाला देणार होता; परंतु आता कोणाला देणार ? कोणाला शिकवणार ? संसारातील त्याचे लक्ष उडाले. त्याला कशात रस वाटेना. वनात जाऊन राहावे असे त्याने ठरविले.

एके दिवशी तो राजाकडे गेला व म्हणाला, 'राजा, आजपर्यंत तुझी सेवा केली, देशाची कीर्ती जगभर नेली. अजिंक्य वीर म्हणून तुझ्या दरबारात मी राहिलो; परंतु अत:पर मला सर्व गोष्टींचा वीट आला आहे. सर्वसंगपरित्याग करून रानावनात जाऊन राहावे असे वाटत आहे. मला परवानगी दे.'

राजा म्हणाला, 'रुस्तुम, तू जात आहेस याचे वाईट वाटते; परंतु तुझ्या इच्छेविरुद्ध तुला ठेवणे बरे नव्हे. त्याचा उपयोगही नाही. मन प्रसन्न असेल तर आपल्या सर्व शक्तींचा उपयोग होतो. जा. रुस्तुम, तू देशाचे नाव सर्वत्र नेलेस. तू स्वत:चे पवित्र जीवन धन्य केलेस. जा. परंतु देशाला विसरू नकोस. कधी कठीण काळ आला तर धावून ये.' रुस्तुम म्हणाला, 'राजा, देशावर संकट आलेच तर मला कळव. मी येईन. देशाचे ऋण सदैव शिरावर असते.'

राजधानी सोडून रुस्तुम निघाला. सर्वांना वाईट वाटले. रुस्तुम एका पहाडात जाऊन राहिला. गुहा हे त्याचे घर. तो एखाद्या सिंहासारखा वनात संचार करीत राही. झऱ्यांचे पाणी पिई. झाडांची फळे खाई.

आणि इकडे रुस्तुमचा मुलगा वाढू लागला. त्याचे नाव सोराब असे होते. सर्वांचा तो आवडता होता. आजीआजोबा त्याचे लाड करीत. आई त्याला प्रेमाने जवळ घेई. सोराब भराभर वाढू लागला. सिंहाचा तो छावा होता. मुलांचा तो म्होरक्या होई. सर्वांचा तो पराजय करी. कुस्तीत सर्वांना तो चीत करी. तो पोहण्यात पटाईत झाला. झाडांवर चढण्यात तरबेज झाला. हळुहळू तो सर्व मल्लविद्या, युद्धविद्या शिकू लागला. रुस्तुमचे सामर्थ्य पुत्रात उतरले होते. तो अशी तलवार खेळे की जणू वीज नाचावी. तो अचूक भाला मारी. गदायुद्धातही तो प्रवीण झाला आणि घोड्यावर बसण्यात तर त्याचा कोणीच हात धरू

शकत नव्हता. केवढाही मस्तवाल घोडा आणा. सोराब त्याला रेशमासारखा मऊ करी. त्याची मांड अढळ होती. पन्नास-साठ मैल तो घोड्यावरून रपेट करून यायचा. सोराब अभिनव असा तेजस्वी वीर दिसू लागला.

तो अद्याप कोवळा होता. ओठांवर मिसरूड अद्याप फुटायची होती; परंतु हाडपेर मोठे होते. कसा राजबिंडा दिसे. त्याचे डोळे मोठे होते. भिवया कमानदार होत्या: नाक जरा लांबट व मोठे होते. त्याच्या केसांची झुलपे फारच शोभत. सुंदर पोषाख करून तलवार कमरेस लटकवून जेव्हा तो आईसमोर उभा राही तेव्हा त्याची दृष्ट काढावी असे त्या माउलीला वाटे.

एकदा सोराब तरुणमंडळात बसला होता. त्यांची बोलणी चालली होती. बोलता बोलता निराळ्याच गोष्टी निघाल्या.

'सोराब, तू रे कोणाचा मुलगा? कोठे आहेत तुझे बाबा? तुझी आई व तू येथेच का राहाता? काय आहे गौडबंगाल?' एकाने विचारले.

'माझे बाबा मी पाहिले नाहीत परंतु त्यांची खूण माझ्या दंडावर आहे. त्यांनी दिलेला ताईत दंडावर आहे. कोठे तरी माझे बाबा आहेत. हो, असलेच पाहिजेत.' सोराब म्हणाला.

'मग का नाही जात बापाला भेटायला? लोक नाना शंका घेतात. जा. पित्याचा शोध कर. आईला त्यांची भेट करव. खरा पुत्र असशील तर पुत्रधर्म पाळ.' मित्र म्हणाले.

सोराब अस्वस्थ झाला. तो एकटाच दूर हिंडत गेला. कोठे असतील माझे बाबा? खरेच, कोठे असतील? कोठे त्यांना शोधू? जाऊ का जगभर हिंडत?. परंतु आईला वाईट वाटेल; परंतु आईचीच अब्रू निष्कलंक राहावी, कोणी शंका घेऊ नये म्हणून मी गेले पाहिजे. बाबांना घेऊन आले पाहिजे. कोठे तरी भेटतील. माझे बाबा भेटतील. खरी तळमळ असेल तर का इच्छा पूर्ण होणार नाही?

तो आज उशीरा घरी आला. आई चिंतातुर होती.

'सोराब, आज एकटाच कोठे हिंडत गेलास? लवकर का नाही घरी आलास? तू माझी आशा, तू माझे प्राण. जरा डोळ्यांआड झालास तर प्राण कासावीस होतात. आज असा रे का तुझा चेहरा? हसरा, गोड चेहरा का रे काळवंडला? कसली चिंता, कसले दु:ख?'

'आई, माझे बाबा कोठे आहेत?'

'मला नाही माहीत. तू आपला माझ्याजवळ राहा.'

'नाही आई. बाबांना भेटायला मी तहानेलो आहे. कोठे आहेत माझे बाबा? लहानपणापासून मी पाहिले नाहीत. कधीसुद्धा पाहिले नाहीत. मला बाबांनी कधी मांडीवर घेतले नाही, मला खेळवले नाही, माझे मुके घेतले नाहीत. नेहमी तूच मला घेत असस, कुरवाळीत असस. नाही तर आजी- आजोबा घ्यायची; परंतु आज बाबांची तहान मला लागली आहे. अत:पर बाबांचे दर्शन झाल्याशिवाय मी हसणार नाही. आई, मला जाऊ दे. माझ्या जन्मदात्याला शोधू दे. मी बाबांना शोधून आणीन. मला ते भेटतील. हृदयाची खरी इच्छा का अपूर्ण राहील?'

'सोराब, तुझ्या आईला का तू सोडून जाणार? आजी आजोबा म्हातारी झाली. उद्या ती मेली तर मी कोणाच्या आधारावर राहू? कोणाच्या तोंडाकडे पाहू? तू पित्याच्या शोधार्थ जात आहेस आणि आईची नाही का तुला काळजी? तुझ्या पित्याला तुझी जरूर नाही. नाही तर ते येते, तुला भेटते, तुला जवळ घेते. तुझा पिता कठोर आहे. उग्र आहे. नको जाऊ. सोराब, नको जाऊ. आता तू वयात आलास. तू लग्न कर. थोरामोठ्यांच्या मुली सांगून येत आहेत. तुझे रूपसौंदर्य पाहून, तुझा पराक्रम पाहून सारे खूष आहेत. लग्न 'कर. सुखाचा संसार कर. आईला आनंद दे. सोराब, माझे ऐक.'

'नाही आई. मी जाणार. माझे बाबा मला भेटल्याशिवाय मला चैन पडणार नाही. तू रडू नको. संसारात इतक्यात पडण्याची मला इच्छा नाही. बाबांना भेटेन. मग संसार. बाबाच माझे लग्न लावतील. बाबा दूर असता का लग्न लावू? पिता परागंदा असता का सुखोपभोगात राहू? आई, काय हे बोलतेस? मी जाणार, जाणार. माझी तलवार व भाला घेऊन जाणार. माझा घोडा घेऊन जाणार. त्रिभुवन मी शोधणार. बाबांना भेटणार. त्यांना घेऊन येणार. तुझी त्यांची भेट घडवणार. आई, नको मला रोधू, नको निराळे बोधू; मला निरोप दे, आशीर्वाद दे.'

'नसशीलच ऐकत तर जा; परंतु तुझा पिता तू कसा ओळखशील? दंडावरचा ताईत दाखव, म्हणजे तो तुला ओळखील. हो. आईचे नाही ना ऐकत? मी दुर्दैवीच आहे. पतीने त्याग केला नि पुत्रही आता सोडून जाणार.' असे म्हणून ती रडू लागली. सोराबने तिचे समाधान केले.

एके दिवशी आपल्या आवडत्या घोड्यावर बसून सोराब पित्याच्या शोधार्थ निघाला. आपला पिता मोठा पराक्रमी आहे असे त्याने ऐकले होते; परंतु कोठे भेटणार? कोठेही शोध लागेना. पत्ता कळेना. राजधानीतील लोक म्हणत, 'पुष्कळ वर्षांपूर्वी तो निघून गेला. त्याचे दर्शन त्यानंतर झाले नाही.'

सोराब इराण देशभर भटक भटक भटकला. त्याने सारी शहरे पाहिली. सर्वत्र शोध केला; परंतु पित्याची माहिती कळेना. आता काय करावे? सोराब सचिंत झाला. त्याने स्वदेश सोडला. इराण सोडून जवळच्या एका राजाकडे तो गेला. त्या राजाच्या पदरी तो राहिला. सोराबची कीर्ती वाढू लागली. तो शूर व पराक्रमी होता. त्याच्याबरोबर द्वंद्वयुद्धात कोणी टिकत नसे. तो अजिंक्य झाला. सोराबची कीर्ती इराणच्या राजाच्या कानावर गेली. दरबारात गोष्टी होऊ लागल्या. पूर्वी रुस्तुम होता, त्याने इराणचे नाव राखले होते; परंतु या सोराबला कोण तोंड देणार? हा सोराब नवजवान आहे म्हणतात. विशीपंचविशीचे वय. अशा तेजस्वी तरुणाशी कोण सामना देणार? उद्या आव्हान द्यावे तर ते कोण घेणार? इराणी दरबारात अशी चर्चा चाले व चिंताही वाटे.

सोराब ज्या राजाच्या पदरी होता, त्याला इराणी राजाचे वैषम्य वाटत होते. इराणी राजाचा पराजय करता न आला तरी नक्षा उतरवावा असे त्याने ठरवले. त्याने आपल्या मुत्सद्यांजवळ बोलणे केले. त्यांनी एक कारस्थान रचले. राजाने सोराबची एके दिवशी खास मुलाखत घेतली.

'सोराब, तुम्हाला एखादी गोष्ट करायला सांगितली तर कराल?' राजाने विचारले.

'असे का विचारता? प्राणांची मला पर्वा नाही. हे प्राण पित्याच्या भेटीसाठी आहेत. पित्याची भेट होत नसेल तर हे करंटे प्राण राखून तरी काय फायदा? सांगा कोणते कर्म करू?'

'इराणवर स्वारी करावी असे आम्ही ठरवीत आहोत.'

'इराणवर? माझ्या मातृभूमीवर? माझे देशबंधू का मी ठार करू? इराण सोडून कोठेही मला लढायला पाठवा.'

'सोराब, लढाई नाही करायची. कत्तली नाही करायच्या. आपण आक्रमणासाठी म्हणून फौजा घेऊन जाऊ; परंतु इराणी राजाला निरोप पाठवू की, 'राजा, लाखोंचा संहार कशाला करायचा? तुझ्याकडील एक वीर पाठव.

आमच्याकडील एक वीर येईल. द्वंद्वयुद्ध होऊ दे. ज्याच्या बाजूचा वीर पडेल त्याचा पराजय झाला असे समजावे.' सोराब, चांगली आहे की नाही योजना ? आणि तुमचेही कदाचित काम होईल. रुस्तुम असलाच तर तो अशा वेळेस लढायला कदाचित येईल. देशाच्या संकटकाळी तो जिवंत असेल तर धावत आल्याशिवाय राहाणार नाही. रुस्तुम आला तर तो तुला भेटेल. पितापुत्रांची भेट होईल. खरे की नाही ?'

'होय महाराज. चांगली आहे युक्ती.'

आणि त्याप्रमाणे ठरले. इराणच्या राजावर स्वारी करण्याचे निश्चित झाले. फौजा तयार झाल्या. तलवारी खणखणू लागल्या. भाले सरसावले. तंबू, डेरे, राहुट्या सारे सामान निघाले. मोठ्या ईर्षेने ते प्रचंड सैन्य इराणच्या हद्दीकडे निघाले.

इराणच्या राजाला ही गोष्ट कळली. त्यानेही कूच करण्याचे नगारे केले. फौजा सिद्ध झाल्या. मारणमरणाची लढाई करण्यास वीर निघाले. ढाली सरसावल्या. भाले चमकले. देशासाठी लढाई होती. प्रत्येकजण घराबाहेर पडला.

दोन्ही फौजांचे समोरासमोर तळ पडले. एका बाजूला नदी वाहात होती. दोन्ही फौजांच्या मध्ये प्रचंड वाळवंट होते. जिकडेतिकडे डेरे, तंबू, राहुट्या, पाले दिसत होती. घोडे खिंकाळत होते. उंट दिसत होते. वीर केव्हा युद्ध सुरू होते याची वाट पाहात होते. तलवारी रक्तासाठी तहानेल्या होत्या. भाले घुसण्यासाठी शिवशिवले होते.

कोणीच आधी हल्ला करीना. असे किती दिवस चालणार ? शेवटी आक्रमण करून येणाऱ्या राजाने एक जासूद पाठविला. त्याच्या बरोबर एक पत्र होते. काय होते त्या पत्रात ? त्या पत्रात द्वंद्वयुद्धाची मागणी होती. आमच्याकडील वीर तयार आहे असे त्यात लिहिलेले होते. पत्र देऊन जासूद परतला. इराणच्या राजाने बैठक बोलावली. विचार होऊ लागला.

'लाखो लोक मरण्यापेक्षा द्वंद्वयुद्धाने निकाल लागावा हे बरे नाही का ?' राजाने विचारले.

'परंतु आपल्याकडे असा अद्वितीय योद्धा आज कोण आहे ? रुस्तुम होता, परंतु तो कोठे गेला त्याचा पत्ता नाही. वीस वर्षे होऊन गेली. तो असता तर अब्रू सांभाळता. शत्रूकडे सोराब म्हणून एक अद्वितीय योद्धा आहे. नवजवान

आहे. तोच येणार द्वंद्वयुद्धाला. त्याच्याशी कोण भिडेल? एका सोराबच्या जोरावर शत्रू लढाई जिंकू पाहात आहे. आपण शत्रूची ही योजना पसंत करू नये.' सेनापती म्हणाला.

'परंतु त्यात कमीपणा आहे. इराणात वीरपुरुष नाही अशी कबुली देण्यासारखे आहे. अजिंक्यपत्र शत्रूला देण्यासारखे आहे. सैन्यात सोराबशी सामना देऊ शकेल व विजयश्री आणील असा कोणीच नाही का? इराण का निर्वीर्य झाला? जा, शोधा, तपास करा.' राजाने रागाने सांगितले.

'महाराज, सोराबची कीर्ती का आपल्या कानांवर आली नाही? चारी पाय धरून तो हत्तीला उचलतो. तो सिंहाचा जबडा उघडून त्याचे दात मोजतो. वाघाला एका थपडेने त्याने ठार केले. हाताच्या मुठीने तो पाषाणाचा चुरा करतो. झाडाला दंडाची धडक देतो व झाड पाडतो. सोराब! त्याचे नाव ऐकताच सारे मागे जातात. आपल्यातील कोणीही त्याच्याशी द्वंद्वयुद्धात टिकणार नाही. रुस्तुम कोठे असेल तर बोलवा, त्याचा पत्ता कोणाला माहीत आहे का विचारा.' सेनापती म्हणाला.

'रुस्तुमशिवाय नाही का कोणी?'

'कोणी नाही. रुस्तुमच लाज राखील. देशाचे नाव राखील. त्याला बोलावणे पाठवा.'

'रुस्तुमचा पत्ता फक्त मला माहीत आहे. आणीबाणीच्या वेळेस त्याला बोलावता यावे म्हणून त्याचा पत्ता मी मिळवून ठेवलेला आहे.'

'जाऊ दे तर रुस्तुमकडे दूत. मी पत्र देतो. देशासाठी ये, असे लिहितो.'

'वा, छान. रुस्तुम आला तर विजय आपला आहे. रुस्तुम अजिंक्य आहे. इराणचे नाव राहाणार.'

एक जासूद वायुवेगाने निघाला. घोड्यावर बसून तीराप्रमाणे निघाला. पहाडात रुस्तुमची गुहा शोधीत तो जासूद हिंडत होता. रुस्तुम वनात परिभ्रमण करीत होता. शेवटी जासुदाची व त्याची गाठ पडली.

'प्रणाम, रुस्तुम, प्रणाम.'

'काय आहे काम?'

'राजाचे काम. देशाचे काम. हे घ्या पत्र. लवकर निघा. इराणची अब्रू वाचवायला निघा.' रुस्तुमने पत्र वाचले.

'निघता ना रुस्तुम ?'

'मी येऊन काय उपयोग ? मी आता वृद्ध झालो. मला मुलगा असता तर इराणसाठी आज उभा राहाता. देशाचे नाव राखता. मी येऊन काय करू ? केस पाहा पिंगट झाले. पांढरे झाले. दंड पाहा बारीक झाले. मी कमावलेले नाव का गमावू ? अजिंक्य रुस्तुमची कीर्ती का कलंकित करू ? नाही. मी येणार नाही. जा.'

'रुस्तुम, असे करू नका. तुम्ही वृद्ध असलेत म्हणून काय झाले ? सिंह वृद्ध झाला तरी हत्तींना मारील, त्यांची गंडस्थळे फोडील. तुमचे दंड म्हणजे लोखंडी आहेत. निघा. इराणची अब्रू धोक्यात आहे. राजाने आग्रहपूर्वक तुम्हाला बोलावले आहे.'

'राजाला आज माझी आठवण झाली. गेल्या वीस वर्षांत हा रुस्तुम जिवंत आहे की मेला याची चौकशीही राजाने केली नाही. कृतघ्न आहे हा राजा. आज कामाच्या वेळी तुला पाठवले. स्वत: का नाही आला ? इराणचे नाव तू राख म्हणावे. जा, मी नाही येत. रुस्तुम मेला म्हणावे.'

'रुस्तुम, तुम्ही थोर आहात. तुम्हाला मी सांगावे असे नाही. राजाची चूक झाली; परंतु राजाच्या चुकीमुळे तुम्ही देशाची मान खाली करणार का ? आणि राजाला तुम्हीच नव्हते का सांगितलेत की फक्त संकटाच्या वेळेस मला हाक मारा असे ? रुस्तुम, ही रागावण्याची वेळ नाही. निघा. शत्रूने आव्हान दिले आहे, ते स्वीकारलेच पाहिजे. ते पाहा तुमच्या डोळ्यांत पुन्हा तेज येत आहे. ते पाहा तुमचे दंड प्रस्फुरू लागले. ती पाहा तुमची छाती रुंदावली. उठा. रुस्तुम, उठा. वीर पुरुष तुम्ही. वीराला पाहून वीराला स्फुरण चढते. शत्रूकडे सोराब म्हणून एक धिप्पाड नवयुवक आहे. सिंहाहून तो शूर आहे. तोच बहुधा तुमच्याबरोबर लढायला येईल. चला, अशी जोड साऱ्या जन्मात तुम्हाला मिळाली नसेल. ह्या नववीराबरोबर लढा. इराणी वृद्ध झाला तरीही अजिंक्य असतो असे दाखवा. चला. निघा. सारे वाट पाहात आहेत. सर्वांची तोंडे उतरली आहेत. राजा सचिंत आहे. तुम्ही आलेत तर सर्वांमध्ये चैतन्य येईल. सर्वांना हुशारी वाटेल. स्वदेशाची तुम्हाला दया नाही येत ? मातृभुमीचा अभिमान नाही तुम्हाला वाटत ? रानावनात राहून तुमचे हृदय का दगडासारखे झाले ?

भावनांचे झरे का सारे सुकले ? सारी उदात्तता का गेली ? रुस्तुम उठा, स्वदेश हाक मारीत आहे.'

रुस्तुम विरघळला. तो धिप्पाड पुरुष निघाला. रानावनात राहिल्यामुळे त्याचा चेहरा राकट व उग्र दिसत होता. जासुदाबरोबर तो निघाला. राजाचे दूत वाटच पाहात होते. त्यांनी वार्ता आणिली की रुस्तुम येत आहे. राजा सामोरा गेला. रुस्तुमला त्याने आदराने आणले.

'रुस्तुम, देशाचे नाव राखा. वृद्धावस्थेत तुमच्यावर ही जबाबदारी टाकायला आम्हाला संकोच वाटतो, पण उपाय नाही.' राजा म्हणाला.

'मला मुलगा असता तर इराणचे नाव राखता. शत्रूकडील तरुणाशी लढायला इराणमध्ये तरुण असू नयेत ही लाजिरवाणी गोष्ट आहे.'

'परंतु आपण उलट असे दाखवू या की, इराणमधील वृद्धही शत्रूकडील ताज्या दमाच्या तरुणास लोळवतात. रुस्तुम, ही चर्चेची वेळ नाही. शत्रूला कळवू ना की आमची तयारी आहे म्हणून ?'

'परंतु माझी एक अट आहे. माझे नाव कळवू नका. मी पडलो तर माझ्या नावाची अपकीर्ती नको ! मी वृद्ध आहे. रुस्तुमच्या नावाला अपयशाचा डाग नाही लागता कामाचा. आमच्याकडचा कोणी एक अनामिक वीर युद्धास येईल असं कळवा.'

'ठीक.'

शत्रूकडे त्याप्रमाणे कळविण्यात आले आणि सामन्याची तारीख ठरली. दोन्ही बाजूंची सैन्ये तो अद्वितीय समरप्रसंग पाहायला उभी राहिली. असे द्वंद्व पुन्हा कधी पाहायला मिळणार ?

सोराब उठला. त्याने आपल्या घोड्याला थोपटले. घोड्यावर त्याचे फार प्रेम होते. घोड्याचे नाव 'रुक्ष' असे होते.

'रुक्ष, आज मी विजयी होऊन येईन का ? विजयी होऊन आलो तर तुला पुन्हा भेटेन. पडलो तर शेवटची भेट. रुक्ष, मी तुला बाबांना शोधण्यासाठी फार श्रमवले, खरे ना ? क्षमा कर. तुला कधी रागाने टाचा मारल्या असतील, चाबूक मारला असेल, क्षमा कर. पित्याला भेटायच्या उत्कंठतेमुळे तसे हातून घडले असेल. रुक्ष, जर मी विजयी होऊन आलो तर पुन्हा निघू बाबांना शोधायला. हो. कारण या विजयाचा मला काय आनंद ? मला एकाच गोष्टीचा

आनंद आहे. एकच गोष्ट मला हवी आहे. माझे बाबा. मला धन नको, कीर्ती नको, मानसन्मान नको, राज्य नको. माझे बाबा मला हवे आहेत. खरे ना रुक्ष? तू माझे हृदय जाणतोस, माझ्या भावना ओळखतोस. मी जिवंत परत आलो तर तू आपल्या पाठीवरून पुन्हा मला वायुवेगाने सर्वत्र ने. जातो हं.'

रुक्षचा निरोप घेताना सोराबच्या डोळ्यांत पाणी आले. सोराब कोवळा तरुण होता. उदार व दिलदार होता. त्याचे मन अद्याप घट्ट नव्हते झाले. हृदय निष्ठुर नव्हते झाले. त्याचे उदार व उदात्त शौर्य होते. त्याच्या पराक्रमातही कोवळीक होती. शौर्यात दिलदारी होती.

तलवार, भाला, गदा, तोमर घेऊन सोराब निघाला. सर्व शस्त्रांनी सज्ज होऊन निघाला. ढाल घेऊन निघाला. त्याच्या राजाने त्याला आशीर्वाद दिला. हजारो सैनिकांनी जयघोष केले. नगारा वाजू लागला. शिंगे वाजली. निघाला महावीर द्वंद्वयुद्धाला.

आणि तो पाहा प्रचंड रुस्तुम तिकडून येत आहे. तो पाहा त्याचा उग्र, भीषण, राकट चेहरा. त्याच्या जीवनातील सारी कोमलता जणू सुकून गेली आहे. पुत्र नाही या भावनेमुळे त्याचे वात्सल्य जणू वाळून गेले आहे. निष्ठुर, कठोर रुस्तुम. इराणच्या राजाने त्याला निरोप दिला. इराणी सैन्याने प्रचंड जयघोष केला. वाद्ये वाजू लागली. रणवाद्ये.

दोघे समोरासमोर आले. एकमेकांनी एकमेकांस पाहिले. सोराबच्या तोंडावर मृदू हास्य शोभत होते. उग्रता नव्हती. सोराबने आपल्या प्रतिस्पर्ध्यास मधुर वाणीने विचारले, 'कोण आपण, आपले नाव काय?'

'नाव गाव काय विचारतोस? का माझी मुलगी मागायची आहे? लग्नाला आलास की लढाईला? चल, तयार हो. चावटपणा बंद कर.' आणि रुस्तुम धावून आला. सोराबही सरसावला. तलवारींची खणाखणी होत होती. ते आपापल्या ढालींवर वार झेलीत होते. एकमेकांना प्रहार करू पाहात होते. कंठस्नान घालू पाहात होते. हत्ती व हत्तीचा छावा यांचे जणू ते युद्ध होते. सिंह व सिंहाचा छावा यांचे ते युद्ध होते. रुस्तुमची शक्ती अचाट होती; परंतु सोराब चपळ होता. विजेप्रमाणे तो चपळाई दाखवीत होता.

तलवारींची लढाई संपली. दोघांच्या तलवारी तुटल्या. आता रुस्तुमने गदा घेतली हातात. अगडबंब गदा. ती गदा होती की रुस्तुमने प्रचंड वृक्षच उपटून

हाती घेतला होता? केवढी गदा! ती डोक्यावर पडली तर सोराब का वाचेल? आला. प्रचंडकाय रुस्तुम धावून आला.

'थांब पोरा. तुझा चेंदामेंदा करतो.' रुस्तुम गर्जला. सर्व शक्ती एकवटून त्याने गदा वर उचलली व हाणली; परंतु हे काय? सोराब कोठे आहे? विजेच्या चपळाईने तो एकदम बाजूस सरकला होता. त्याने घाव चुकवला आणि रुस्तुमच गदेसह खाली पडला. वाळूत पडला. ती वेळ होती रुस्तुमला मारण्याची; परंतु सोराब त्याच्याकडे पाहातच राहिला. प्रेमाने व करुणेने पाहात राहिला. सोराबच्या डोळ्यांत शत्रुता नव्हती. तेथे प्रेम होते.

'ऊठ, महावीरा! ऊठ. तू पडलेला असताना तुझ्यावर घाव मी घालणार नाही. पुन्हा गदा नीट सरसावून ये. माझ्या मस्तकाचा चेंदामेंदा कर. जोराने घाव घाल. मला तुझ्यावर जोराने घाव घालता येत नाही. हात धजत नाही. का बरे असे होते? हे महापुरुषा, तू कोण, कोठला? तुझे नाव काय? कोणाशी मी लढत आहे?'

'चावट, वात्रट पोरा, तू गप्पा मारायला आला आहेस की मारणमरणाला? नावे गावे काय विचारतोस? म्हणे हात धजत नाही. आलास कशाला भ्याडा? वीरांची गाठ घेण्याऐवजी बायकांत जाऊन बस. तेथे नाच, खेळ, मौज कर. घाव चुकविण्यासाठी नाचतोस काय? तू वीर नाही दिसत. नाच्या पोऱ्या दिसतोस. सावध राहा आता. हा भाला घेऊन येतो आता. हा भाला तुझ्या हृदयातून आरपार जाईल. नाचऱ्या पोरा, बघू किती नाचतोस, किती चुकवतोस ते.'

असे म्हणून रुस्तुम तो प्रचंड तेजस्वी भाला घेऊन धावला. सोराबही जरा संतापला; परंतु काय असेल ते असो. आयत्या वेळेस त्याचा हात थरथरे, शक्ती जणू निघून जाई.

आणि हे पाहा एकाएकी वादळ आले. वारे सुटले. आकाशात मेघ जमले. सूर्य झाकाळला गेला. का बरे? सूर्यनारायणाला पिता-पुत्रांचे ते अस्वाभाविक युद्ध का पाहावत नव्हते? त्याने का तोंड झाकून घेतले? वाळूचे लोट वर उडाले. क्षणभर काही दिसेना.

परंतु वारे थांबले. वाळू उडायची थांबली.आकाशात ढग मात्र जमतच होते. रुस्तुमने सोराबला पेटलेल्या डोळ्यांनी पाहिले आणि त्याने तो भाला मारला.

लागला भाला. सोराबच्या छातीत तो घुसला. पडला. तरुण कोमल वीर पडला. रुस्तुम तुच्छतेने त्याच्याजवळ आला.

'नाच्या पोऱ्या, पडलास धुळीत? आहे का उठायची पुन्हा छाती? ऊठ, माझा सूड घे. कर मला प्रहार. तुला बडबड करायला येते. प्रहार मात्र करता येत नाही. त्या वेळेस कचरतोस.' रुस्तुम उपहासाने बोलत होता.

'माझ्या मरणाचा सूड रुस्तुम घेईल!'

'कोण घेईल?'

रुस्तुम. अजिंक्य महान योद्धा रुस्तुम. रुस्तुमला कळले की त्याचा मुलगा मारला गेला, तर तो खवळेल व पुत्राचा वध करणाऱ्याचा तो सूड घेईल.'

'तुला काय माहीत रुस्तुम?'

'मला माहीत आहे. तो माझा जन्मदाता आहे.'



'रुस्तुमला मूलबाळ नाही. मरताना खोटे नको बोलूस. असलीच तर रुस्तुमला मुलगी असेल. रुस्तुमला मुलगा नाही.'

'मी जन्मात खोटे बोललो नाही. रुस्तुमच माझा पिता. मला अभिमान वाटतो. पित्याला शोधण्यासाठी मी त्रिभुवन हिंडलो; परंतु तो सापडेना. द्वंद्वयुद्धाच्या वेळेस कदाचित पिता येईल व भेटेल असे वाटत होते; परंतु तुम्ही आलेत. तुम्ही कोण आहात? रुस्तुमचे का दोस्त? तुमच्यावर खरेच मला प्रहार करवेना. तुम्हाला पाहाताच तुम्हाला मिठी मारावी असे मला वाटले. म्हणून मी तुमचे नाव विचारले. कोण आहात तुम्ही? रुस्तुमचे मित्र असाल तर त्याला सांगा की तुझा मुलगा तुझा शोध करीत होता. तुझे चिंतन करीत तो मेला. हे काय, तुम्ही असे कावरेबावरे का दिसता? तुम्ही वीर आहात. मला पाडलेत. मला मरणाचे भय नाही. वीर मरणाचे स्वागत करतो आणि जगून तरी मला काय करायचे होते? पित्याशिवाय मी कसा जगू? मी द्वंद्वयुद्धाला आलो तो कीर्तीसाठी नाही. माझे बाबा कदाचित भेटतील म्हणून; परंतु नाही आले बाबा. तुम्ही आलेत. तुम्ही कोण? खरेच, कोण? रडू नका. रुस्तुमला तुम्ही जाणता? ओळखता? मला भेटायला तेही का तडफडत आहेत? त्यांना आता काय सांगावे म्हणून तुम्हाला वाईट वाटत आहे? रडू नको वीरा. रुस्तुमला सांगा की त्याचा पुत्र सोराब शूराप्रमाणे लढून मेला. मी रुस्तुमला शोभेसा नाही का, तुम्हीच सांगा.'

'तू रुस्तुमचा मुलगा? तुझ्याजवळ खूण आहे काही? आईने दंडात काही बांधले आहे?'

'हो. या दंडात ताईत आहे. तुम्ही जवळ येऊन पाहा.'

आणि रुस्तुम सोराबच्या जवळ गेला. त्याने हलक्या हाताने दंडावरचे कपडे दूर करून पाहिले, तो ती खूण! त्याने पत्नीजवळ दिलेला तो ताईत! आणि रुस्तुम एकदम दुःखाने रडू लागला. पहाड पाझरू लागला. 'सोराब, अरे तूच माझा पुत्र. मीच तो रुस्तुम. मीच तुला मारले. मीच पुत्राला मारले. अरेरे, मुलगा व्हावा म्हणून कोण मला उत्कंठा होती! परंतु तिने मला कळविले नाही. सोराब, बाळ! अरेरे! कसा रे घाव मी घातला! कसा भाला मारला! बाळ, खरेच, तू पित्याला शोभणारा आहेस. खरेच हो तुझा हात चालत नव्हता. तुझे निर्मळ पवित्र हृदय. त्या हृदयाने आतडे ओळखले होते. जन्मदात्याला

ओळखले होते; परंतु मी पुत्राला ओळखले नाही. त्याला नावे ठेवली. नाऱ्या पोऱ्या म्हटले. बाळ, तू शूराहून शूर आहेस; परंतु आता काय? अरेरे, असे कसे झाले! 'सोराब सोराब!' असे म्हणून रुस्तुम विलाप करू लागला.

'बाबा, रडू नका. माझे डोके तुमच्या मांडीवर घ्या. या भाल्याच्या वेदना सहन नाही होत; परंतु छातीतून तो काढण्यापूर्वी मला पित्याच्या भेटीचे सुख अनुभवू दे. आयुष्याचा शेवटचा क्षण गोड होऊ दे. कृतार्थ होऊ दे. घ्या माझे डोके मांडीवर. माझ्या तोंडावरून हात फिरवा. माझा मुका घ्या. प्रेमाने म्हणा, 'सोराब, बाळ सोराब.' रडू नका बाबा. पितृप्रेमाचा आनंद मला चाखवा. तो आनंद शेवटच्या क्षणी तरी मला द्या. पोटभर द्या. वेळ थोडा राहिला आहे. माझ्या आयुष्याच्या वाळूचे कण संपत आले आहेत. घटका भरत आली आहे. जग सोडून मी चाललो. या जगात विजेसारखा आलो. वाऱ्यासारखा चाललो. ऐन तारुण्यात चाललो; परंतु जायला हवे. एक दिवस मरण आहेच. तुम्ही भेटलेत, माझी आशा सफळ झाली. हृदयाची तळमळ शांत झाली. जे शोधीत होतो ते शेवटच्या क्षणाला मिळाले. बाबा, आता मला समाधान आहे. आईला भेटा. माझा घोडा रुक्ष याची काळजी घ्या. थोपटा ना मला.'

आणि रुस्तुमने सोराबचे डोके मांडीवर घेतले. त्याचे केस झाडले. त्याच्या तोंडावरून आपला तो राकट दणकट परंतु आता वात्सल्याने थबथबलेला असा हात फिरविला. त्याने सोराबचा मुका घेतला. मस्तकाचे अवघ्राण केले. पित्याच्या डोळ्यांतील अश्रू पुत्राच्या मुखकमलावर पडले. सोराबच्या मुखावर मंदमधुर स्मित होते. कृतार्थतेचे, धन्यतेचे ते स्मित होते. 'बाबा, काढा आता भाला. वेदना सहन नाही करवत. तुम्ही भेटलेत. तुमच्या मांडीवर मरण आले. आनंद!' असे सोराब म्हणाला. रुस्तुमने तो भाला काढला आणि एकदम रक्ताचा पूर उसळला. त्या रक्ताबरोबर सोराबचे प्राणही बाहेर पडले.

आणि आता अंधार पडला. पाऊसही पडू लागला. सैन्ये आपापल्या तळावर गेली. नदीला पूर आला. अपरंपार पूर. आकाशात कडाडत होते. मेघ गर्जत होते. पंचमहाभूते प्रक्षुब्ध झाली होती.

आणि रुस्तुम तेथे होता. मांडीवर सोराब मरून पडला होता. प्रेमळ, शूर, उदार, दिलदार असा सोराब!

**समाप्त**

# बाल कुमार वाचकांसाठी पुस्तकेच पुस्तके

## छोट्यांसाठी मोठ्याटाईपाची सचित्र पुस्तके

बालपंचतंत्र १ ते ५, त्र्यं. पु. थोरात ■ छान गोष्टी १ ते ७, मालतीबाई दांडेकर गोष्टींचा तास १ ते ११, भा. म. वैद्य ■ बाल कल्पना रम्यकथा १ ते ३, बाललेखक मनोरंजक नीतिपाठ १ ते ४ ग. म. वैद्य ■ नवलकथा १ ते ९, गो. वि. रानडे गमतीच्या गोष्टी, नेरूरकर ■ सुरस गोष्टी, ग. म. वैद्य ■ मौजेच्या गोष्टी, वैद्य.

## कुमारांसाठी मनोरंजक व बोधप्रद पुस्तके

मनोरंजक सुबोध गोष्टी १ ते ६ डॉ. पाटणकर ■ सदाशिव शेलार, इंगवले सानेगुरुजींच्या गोड गोष्टी १ ते १० ■ दिन्या मिनीची धमाल, देशपांडे गोट्या भाग १ ते ३, चिंगी, खडकावरला अंकुर, ना. धों. ताम्हनकर, गणितातील गमती, वा. मो. कोळेकर ■ रंगीत अक्षरे, गो. वि. नामजोशी सिंहासन बत्तिशी, घैसास ■ बाल हितोपदेश, थोरात ■ जादूची होडी, शिरवाडकर

## अध्यात्माची आवड निर्माण करणारी संतचरित्रे

राष्ट्रगुरु समर्थ रामदास, न. प. महाजन ■ अक्कलकोट स्वामी महाराज, मालपाठक शेगावचे गजानन महाराज, मालपाठक ■ स्वामी मुक्तानंद, वसंतराव मालपाठक स्वामी विवेकानंदांची गोष्ट, वैद्य ■ रामकृष्ण परमहंसांची गोष्ट, ग. म. वैद्य स्वामी नित्यानंद ■ ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज, ■ जे. कृष्णमूर्ती, कृष्णप्रेमी साईबाबा हाच चमत्कार, डॉ. गवाणकर ■ स्वामी स्वरूपानंद, शांताराम थत्ते.

## पाश्चात्य वाङ्मयाचे मराठीत सुरेख रूपांतर

रॉबिनहुड आणि त्याचे रंगेल गडी, भा. रा. भागवत ■ डॉन क्विक्झोट, मा. पं. शिखरे तीन शिलेदार, सौ. उषा आपटे ■ ■ ■ वीस वर्षांनंतर, सौ. उषा आपटे बाल अरेबियन नाइटस् १ व २ थोरात ■ ऑलिव्हर ट्वीस्ट, दत्त आपटे गलिव्हरचे प्रवास, भा. म. गोरे ■ ■ ■ रॉबिन्सन क्रूसो, वि. स. सुखठणकर सिंदबादच्या ७ सफरी, अ. वा. मराठे ■ पुढे व्हा! १ ते ३, यदुनाथ थत्ते. पॉकिट डिक्शनरी (इंग्लिश-मराठी) ■ मॉडर्न डिक्शनरी (इंग्लिश-इंग्लिश-मराठी) स्टॅण्डर्ड डिक्शनरी १ ते ३ (मराठी-इंगजी-मराठी) ■ सुलभ हिन्दी-मराठी शब्दकोश मराठी शब्द रत्नाकर ■ संस्कृत डिक्शनरी (संस्कृत-इंग्लिश-मराठी-गुजराती)

**संपूर्ण यादी मागवावी. विनामूल्य पाठविण्यात येते.**

## केशव भिकाजी ढवळे

श्रीसमर्थ सदन, पहिली भटवाडी, गिरगाव, मुंबई-४०० ००४.

# साने गुरुजींच्या गोड गोष्टी : १ ते १०

## भाग पहिला : खरा मित्र

आवडती नावडती, तीन मडकी, न्याय देणारा गुराखी, गोसावी, सोन्याची साखळी आणि खरा मित्र अशा या सहा गोष्टी जिव्हाळा आणि ध्येयनिष्ठा निर्माण करतात.

## भाग दुसरा : घामाची फुले

या नऊ विविध गोष्टी म्हणजे मुलांना मेजवानीच! मनोरंजनाबरोबरच नीतिमूल्यांचे दर्शन घडविणाऱ्या या गोड गोष्टी प्रत्येकाच्या जीवनात ध्येय निर्माण करतील.

## भाग तिसरा : मनूबाबा

सिलास मार्नरची ही भावपूर्ण कथा. ज्यावेळेस जीवनाचा उपयोग एखाद्या ध्येयासाठी होऊ लागतो तेव्हाच जीवनाचा विकास होऊ लागतो. जीवनाला अर्थ प्राप्त होऊ लागतो.

## भाग चौथा : फुलाचा प्रयोग

कृष्णकमळीच्या फुलावर सोनेरी छटा उमटवून दाखविणाऱ्याला एक लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केलेले होते. फुलाला मिळाले का ते? भावपूर्ण हृदयस्पर्शी कथा.

## भाग पाचवा : दुःखी

व्हिक्टर ह्यूगोच्या 'ला मिझरेबल' ची ही हृदयस्पर्शी कथा. वालजी चोर होता. एका साधूने त्याला आपली चूक सुधारण्याची एक संधी दिली आणि वालजीचा महात्मा झाला.

## भाग सहावा : सोराब नि रुस्तुम

वडील आणि मुलगा यांचे अनोळखी अवस्थेतील द्वंद्व आज जगात अजरामर झाले आहे. या पुस्तकातील इतर चार कथाही मनाचा वेध घेणाऱ्याच आहेत.

## भाग सातवा : बेबी सरोजा

जीवनात कितीही संकटे आली, आपत्त्या आल्या तरी सत्य सोडू नये, दलितांविषयी प्रेमभाव ठेवावा. परमेश्वरावर विश्वास ठेवावा. हे पटवून देणारी तामीळ भाषेतील हृदयस्पर्शी कथा.

## भाग आठवा : करुणा देवी

शिरीष करुणेला विसरला पण करुणेने कर्तव्याचा सुगंध दरवळत ठेवणारी आपली ज्योत सतत तेवत ठेवली आणि शिरीषच्या अंतरातील विझलेला दीप पुन्हा लावला.

## भाग नववा : यती कि पती

यती होण्यासाठी संसाराचा त्याग करण्याचा प्रयत्न विजयने केला; परंतु मुक्तीचा मार्ग आपल्या सारख्या भावनोत्कट वृत्तीच्या माणसाला अनुरूप नाही हे त्याला पटले.

## भाग दहावा : चित्रा नि चारू

चित्रा नि तिची मुसलमान मैत्रीण फातमा. मैत्रीच्या कर्तव्यापासून निर्माण झालेली चित्रा नि चारूची ही करुणरम्य कथा चित्राच्या वडिलांच्या प्रेमाचीही साक्ष पटविते.


# केशव भिकाजी ढवळे

श्रीसमर्थ सद[illegible] व, मुंबई ४


BVBK-0402542